www.rajdand.com
सातारा/पुणे, मंगळवार
23.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । पौष कृ.२९
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

वाघोलीतील खाणीत बुडून दोन मुलांचा मृत्यू

पुणे : वाघोलीत खाणीत बुडून दोन शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. अली अहमद शेख (वय १२), कार्तिक दशरथ दुखरे (वय १२, दोघे रा. शिवरकर वस्ती, वाघोली) अशी मृत्युमुखी पडलेल्या मुलांची नावे आहेत. वाघोलीतील खाणीत पोहण्यासाठी सोमवारी दुपारी अली, कार्तिक आणि त्यांचे मित्र पोहायला गेले होते. अली आणि कार्तिक यांना पाण्याचा खोलीचा अंदाज आला नाही.

दोघेजण पाण्यात बुडाले. त्यांच्याबरोबर असलेल्या मुलांनी आरडाओरडा केला. त्यांनी या घटनेची माहिती स्थानिकांना दिली. या घटनेची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अग्निशमन दलाला कळविण्यात आली. त्यानंतर अग्निशमन दलाचे अधिकारी विजय महाजन, अल्ताफ पटेल, ओंकार पाटील, विकास पालवे, महेश पाटील, मयूर गोसावी, प्रशांत चव्हाण, उमेश फाळके, सुरज इंगवले, प्रकाश मदने यांनी शोधमोहीम राबविली. जवानांनी दोघांना पाण्यातून बाहेर काढले. उपचारांपूर्वीच अली आणि कार्तिक यांचा मृत्यू झाला. शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याचे समजताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

जगभरात जय श्रीराम

रामनामाने राज्य दुमदुमले, दीपोत्सव साजरा

वॉशिंग्टन/मुंबई : केवळ भारतातच नव्हे, तर जगभरातील अनेक देशांमध्ये अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंद साजरा करण्यात आला. विविध ठिकाणी प्रार्थना आणि इतर धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येतील भव्य मंदिरात प्रभू श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली आणि मुंबईसह राज्यात आनंदोत्सव साजरा झाला. दीपोत्सव, फटाक्यांचा दणदणाट, श्रीराम प्रतिमेच्या शोभायात्रा, मिरवणुका आणि रामनामाचा गजर करीत रामभक्तांनी अपूर्व उत्साहात पुन्हा दिवाळीचा जल्लोष साजरा केला.



प्रदीर्घ लढयानंतर अयोध्येत भव्य राममंदिर उभारले गेल्याने राज्यभरात उत्साहाचे वातावरण आहे. भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद आदी संघटनांच्या नेत्यांनी आणि विविध संस्था, मंदिरे, मंडळे यांनी पुढाकार घेऊन गावागावांत आणि प्रत्येक विभागात विविध उपक्रमांचे आयोजन गेल्या दोन-तीन दिवसांपासून केले आहे. अयोध्येतील राममंदिराच्या प्रतिकृती शेकडो विभागांमध्ये विविध ठिकाणी उभारण्यात आल्या होत्या. तेथे मिरवणुका, होमहवन, रामायण व गीतरामायणाचे कार्यक्रम व दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई-ठाण्यात काही चित्रपटगृहांसह निवासी सोसायटया, मंदिरे, विभागांमध्ये आणि संस्थांतर्फे मोठया पडद्यांवर सोहळ्याचे चित्रीकरण दाखविण्यात येत होते. लक्षावधी रामभक्त प्रतिष्ठापना सोहळ्याचे साक्षीदार झाले, यावेळी अनेकांना आनंदाश्रू अनावर झाले.

प्रदेश भाजपा कार्यालयापुढे अयोध्येतील राममंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली असून श्रीरामांचा भव्य कटआऊट लावण्यात आला आहे. तेथे आज मिठाईवाटप करून जल्लोष करण्यात आला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे कोराडी-नागपूरमध्ये विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते.

रघुपति राघव राजाराम
पतित पावन सीताराम ॥
भद्रगिरीश्वर सीताराम
भगत-जनप्रिय सीताराम ॥
जानकीरमणा सीताराम
जयजय राघव सीताराम ॥
रघुपति राघव राजाराम
पतित पावन सीताराम ॥



मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांच्या पुढाकाराने दादर येथे ८० फूट उंच राममंदिराची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली असून हजारो भाविकांनी दर्शनासाठी गदी केली होती. भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष संजय पांडे यांच्याकडून ओशिवरा मेट्रो स्थानकाजवळ ५० फूट राममंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली असून तेथे आतषबाजी करण्यात आली.

उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकाराने वाळकेश्वर येथील बाणगंगा तलाव येथे ह्यएक दिवा प्रभू रामचंद्रांसाठीह्व या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तेथे २५ हजार दिवे लावून दीपोत्सव साजरा करीत महाआरती झाली. आमदार प्रसाद लाड यांच्या पुढाकाराने शीव

येथील आनंद दळवी मैदानात भव्य रांगोळी च्या माध्यमातून राममंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली होती. गिरगावमध्ये सामूहिक रामरक्षा पठण उपक्रमात हजारो रामभक्तांनी उस्फूर्त सहभाग घेतला.

जो रामाचा नाही, तो कामाचा नाही- एकनाथ शिंदे अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा हा डोळ्यांचे पारणे फेडणारा आहे. या सोहळ्यावर काही लोकांनी बहिष्कार घातला आणि त्यांना काही लोकांनी साथ दिली आहे. अशा सर्व लोकांना देवाने सद्बुद्धी द्यावी. देशात लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत असे सर्व जण जय श्रीरामचा जयघोष करीत आहेत. अशा वेळेस आनंदाने सोहळयात सामील व्हायला पाहिजे; परंतु काही लोक रामाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. यामुळे सर्वांना सद्बुद्धी द्यावी, असे ते म्हणाले. तसेच जो रामाचा नाही, तो कामाचा नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली.

न्यूयॉर्कमधील टाइम्स स्क्वेअर येथे प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट चित्रीकरण पाहण्यासाठी या शहरातील शेकडो भारतीय जमले होते. या ठिकाणी रोषणाई करण्यात आली होती. पारंपरिक पोशाख, नृत्य, भजने आणि इतर गाणी गाताना भारतीय दिसत होते. रविवारी झालेल्या या कार्यक्रमात २,५०० हून अधिक जण सहभागी झाले होते.

केंद्र सरकारची नियमावली अन्यायकारक, खासगी शिकवणीचालक आक्रमक

पुणे : खासगी शिकवण्यांना नियम असण्याबाबत हरकत नाही. मात्र १६ वर्षांखालील मुलांसाठी शिकवण्याच नकोत हा नियम अन्यायकारक असल्याचे सांगत खासगी शिकवणी चालकांनी केंद्र सरकारच्या नियमावलीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील खासगी शिकवणी चालकांची नाशिक येथे २८ जानेवारीला बैठक होणार आहे. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या नियमावलीविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठीच्या शिकवण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच नियमावली जाहीर केली. या नियमावलीनुसार दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वयाची १६ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच आता शिकवणी वर्गाला प्रवेश देता येणार आहे. त्याचबरोबर किमान पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शिक्षक म्हणून नियुक्त करता येईल. त्याचबरोबर प्रत्येक शिकवणी वर्गाने समुपदेशाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शिकवण्यांना १ लाख रुपयांपर्यंत दंड करण्याची किंवा नोंदणी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. पुढील तीन महिन्यांत नव्याने सुरू होणाऱ्या किंवा असलेल्या शिकवण्यांनी नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नोंदणी, पडताळणी, कारवाई आणि एकूण नियमनाची जबाबदारी राज्य शासनांची असेल, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या नियमावलीच्या पार्श्वभूमीवर खासगी शिकवणीचालक आक्रमक झाले आहेत. कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी नियमावलीसाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य बंडोपंत भुयार म्हणाले, की खासगी शिकवण्यांना नियमावली असायला हरकत नाही. पाच राज्यांमध्ये तशी नियमावली आहे. महाराष्ट्रातही २०१८मध्ये समिती



नेमण्यात आली होती. मात्र १६ वर्षांखालील मुलांना शिकवणीच नको हा निर्णय अन्यायकारक आहे. ७० टक्के शिकवण्या १६ वर्षांखालील मुलांच्या आहेत. करोना काळात मुलांचे शिक्षण कच्चे राहिले आहे. ते पक्के झाले पाहिजे. असरच्या अहवालानुसार आठवीच्या मुलांना तिसरी-चौथीचे धडे वाचता येत नाहीत. त्यामुळे सरकारनेच शिकवणी वर्ग नको म्हणणे हा विरोधाभास आहे. या निर्णयामुळे शिकवणीचालकांसह पालक विद्यार्थ्यांचेही नुकसान होणार आहे. लाखो सुशिक्षित या क्षेत्रात कार्यरत आहेत. सरकारी नोकऱ्या, नोकरीच्या संधी नाहीत. त्यामुळे या निर्णयामुळे बेरोजगारी वाढेल. कोटासारख्या ठिकाणी विद्यार्थी मानसिक ताणामुळे आत्महत्या करण्याच्या घटना घडत असल्या, तरी तिथे शिकणारी विद्यार्थी १६ वर्षांवरील असतात. त्यामुळे सरकारच्या जाचक नियमावलीला विरोध आहे.

नियमावलीच्या अनुषंगाने २८ जानेवारीला राज्यभरातील शिकवणीचालक, संघटनांची नाशिकमध्ये बैठक होणार आहे. त्यात आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल. आवश्यकता भासल्यास न्यायालयात दाद मागितली जाईल, असेही भुयार यांनी स्पष्ट केले.

खासगी शिकवणी ही औपचारिक शिक्षणाला पूरक असलेली व्यवस्था आहे. मात्र ही व्यवस्था बंद करण्याचा निर्णय घेतल्यास विद्यार्थी कुठे जाणार हा प्रश्न आहे. केंद्राच्या मार्गदर्शक सूचनांमधील काही तरतूदी जास्तच जाचक आहेत. त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. -दुर्गेश मंगेशकर, खासगी शिकवणीचालक

मनोज जरांगेंची पदयात्रा आज पुण्यात

कडक पोलीस बंदोबस्त, जाणून घ्या वाहतूक बदल

जरांगे यांच्यासह हजारो समर्थक वाघोलीतील चोखीदाणी, खराडी परिसरात मुक्कामी असणार आहेत.

पुणे : मराठा आरक्षणासाठी काढण्यात आलेली पदयात्रा मंगळवारी (२३ जानेवारी) नगर रस्त्यावरील खराडी परिसरात दाखल होणार आहे. मनोज जरांगे पाटील आणि हजारो समर्थक नगर रस्त्यावरील रांजणगाव, कोरेगाव भीमामार्गे खराडी-वाघोली परिसरात मुक्कामी येणार आहेत. त्यानिमित्ताने नगर रस्त्यावरील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत.

नगर रस्त्यावरील वाहतूक मंगळवारी पहाटे तीननंतर टप्याटप्याने वळविण्यात येणार आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून नगरकडे जाणारी वाहने कात्रज, खडी मशिन चौक, मंतरवाडी फाटा, हडपसरमार्गे सोलापूर रस्ता, केडगाव चौफुलामार्गे, न्हावरे, शिरुरमार्गे नगर रस्त्याकडे जातील. वाघोली, लोणीकंदमार्गे नगरकडे जाणारी वाहतूक थेऊर फाटामार्गे सोलापूर रस्त्याकडे वळविण्यात येणार आहे. तेथून केडगाव चौफुला, न्हावरे, शिरुरमार्गे नगरकडे वळविण्यात

येणार आहे. पुणे शहरातून नगरकडे जाणाऱ्या वाहनांनी खराडी बायपास चौकातून उजवीकडे वळून मगरपट्टा चौक, सोलापूर रस्ता, यवत, केडगाव चौफुला, न्हावरे, शिरुरमार्गे नगरकडे जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी केले आहे.

बुधवारी (२४ जानेवारी) सकाळी पदयात्रा मुंबईकडे मार्गस्थ होणार आहे. त्यानंतर पदयात्रा पिंपरी-चिंचवड शहरात दाखल होणार आहे.तेथून पदयात्रा लोणावळ्याकडे जाणार आहे. बुधवारी नगर रस्त्यावरील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. नगरकडून पुण्यात येणारी वाहतूक वळविण्यात येणार आहे. थेऊर फाटा, केसनंद, थेऊरमार्गे वाहतूक सोलापूर रस्त्याने पुण्याकडे वळविण्यात येणार आहे. वाघोली परिसरातील वाहतूक वाघोली, आव्हाळवाडी, मांजरी, केशवनगर, मुंढवा चौकमार्गे वळविण्यात येणार आहे. पुण्यातून नगरकडे जाणारी वाहतूक येरवड्यातील चंद्रमा चौक, आळंदी रस्ता, विश्रांतवाडी, धानोरी, लोहगावमार्गे वाघोलीकडे वळविण्यात येणार आहे.

एक हजार प्रसाधनगृहे; १०० टँकर

जरांगे यांच्यासह हजारो समर्थक वाघोलीतील चोखीदाणी, खराडी परिसरात मुक्कामी असणार आहेत. वाघोली येथील आर. के. फार्मच्या मोकळ्या जागेत मुक्काम असणार आहे. तेथे एक हजार प्रसाधन गृह, रुग्णवाहिका, १०० पाण्याचे टँकर, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी दिली.

कडक बंदोबस्त

पुणे पोलिसांकडून पदयात्रेच्या मार्गावर कडक बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. एक हजार पोलीस कमर्चारी, राज्य राखीव पोलीस दलाच्या दोन तुकड्या, दंगल नियंत्रक पथक, गृहरक्षक दलाचे ८०० जवान तैनात राहणार आहेत. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांच्यासह दोन पोलीस उपायुक्त, सहा सहायक पोलीस आयुक्त, २८ पोलीस निरीक्षक, १२३ सहायक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, तसेच एक हजार पोलीस कमर्चारी, गृहरक्षक दलाचे जवान, राज्य राखीव पोलीस दलाच्या दोन तुकड्या बंदोबस्तास राहणार आहेत.

अयोध्या लवकरच सर्वात मोठे धार्मिक पर्यटन केंद्र

नवी दिल्ली : अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनानंतर हे शहर आता देशातील सर्वात मोठे धार्मिक पर्यटन केंद्र होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या शहराला वर्षाला किमान पाच कोटी पर्यटक भेट देऊ शकतात, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. अमृतसर येथील सुवर्ण मंदिर आणि तिरुपती बालाजी मंदिरापेक्षाही अयोध्येतील राम मंदिरात अधिक भाविकांचा ओघ असण्याची शक्यता आहे.

ह्यब्रोकरेज जेफरीजह्व एका अहवालात अशा प्रकारचा अंदाज व्यक्त केला आहे. नवे विमानतळ, सुधारित रेल्वे स्थानक, शहराचे सुशोभीकरण आणि पायाभूत सुविधा यांवर मोठया प्रमाणात खर्च केल्याने उत्तर प्रदेशातील हे शहर आगामी काळात देशातील सर्वात मोठे धार्मिक पर्यटन केंद्र असेल. अयोध्येचा कायापालट करण्यासाठी सुमारे एक हजार कोटी डॉलर खर्च करण्यात आले असून पर्यटकांसाठी नवी हॉटेल व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने पर्यटकांचा ओघ वाढणार आहे.

नवे विमानतळ, सुधारित रेल्वे स्थानक, शहराचे सुशोभीकरण यातून अयोध्या आगामी काळात देशातील सर्वात मोठे धार्मिक पर्यटन केंद्र असेल.

धार्मिक पर्यटन हा अजूनही भारतातील पर्यटनाचा सर्वात मोठा भाग आहे. अनेक लोकप्रिय धार्मिक केंद्रे पायाभूत सुविधांतील अडथळे असूनही वर्षाला एक ते तीन कोटी पर्यटकांना आकर्षित करतात.

आठ तास ताटकळत ठेवल्यानंतर विमान रद्द

पुणे : विमान प्रवाशांचे हाल दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. पुणे विमानतळावर प्रवाशांना तब्बल आठ तास विमानाची प्रतीक्षा केल्यानंतर अचानक मध्यरात्री ते रद्द झाल्याचे कळविण्यात आले. यामुळे संतप्त प्रवाशांनी विमानतळ प्रशासनासह विमान कंपन्यांच्या प्रतिनिधींना धारेवर धरले. काही प्रवाशांनी तर विमान कंपनीच्या विरोधात घोषणाबाजी केली. यामुळे विमानतळावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

FROM ME TO WE
Gate 7

पुणे विमानतळावरून स्पाईसजेटचे पुणे ते दिल्ली हे विमान २१ जानेवारीला दुपारी ४.२० वाजता नियोजित होते. त्यानंतर हे विमान रात्री ७ वाजता उड्डाण करेल, असे कंपनीने जाहीर केले. प्रवासी विमानाचे उड्डाण कधी होणार याची वाट पाहात विमानतळात थांबले होते. त्यानंतर पुन्हा या विमानाला रात्री ९ वाजेपर्यंत विलंब होत असल्याची घोषणा झाली. काही काळानंतर या विमानाला आणखी विलंब होत असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यावेळी प्रवाशांमध्ये अस्वस्थता वाढू लागली. त्यांनी स्पाईसजेटच्या प्रतिनिधींकडे विचारणा करण्यास सुरूवात केली. मात्र, त्यांच्याकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नव्हते.

अखेर मध्यरात्रीच्या सुमारास स्पाईसजेटचे विमान रद्द झाल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे तब्बल आठ तास विमानतळावर ताटकळत थांबलेल्या प्रवाशांच्या संयमाचा बांध तुटला. त्यांनी स्पाईसजेटस आणि विमानतळ प्रशासनाला यावरून धारेवर धरले. काही प्रवाशांनी स्पाईसजेटच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केल्याने गोंधळ निर्माण झाला. अनेक प्रवाशांनी समाज माध्यमावर याबाबतचे आपले अनुभव मांडले आहेत. स्पाईसजेटवर कारवाई करावी, अशी मागणीही अनेक प्रवाशांनी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री जोतिरादित्य शिंदे यांच्याकडे समाज माध्यमांवरून केली आहे.

पुणे विमानतळावर आम्ही अडकलो आहोत. स्पाईसजेटने दिल्लीला जाणारे विमान खराब हवामानामुळे रद्द केले आहे. इतर विमान कंपन्यांची दिल्लीला जाणारी विमाने सुरळीत सुरू आहेत. स्पाईसजेटकडून आम्हाला इतर कोणतीही सुविधा मिळालेली नाही. कृपया केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी आम्हाला मदत करावी. -अनुज त्यागी, प्रवासी

सुमारे १६० प्रवासी स्पाईसजेटच्या दिल्लीला जाणाऱ्या विमानासाठी आठ तास विमानतळावर ताटकळत थांबले होते. अचानक स्पाईसजेटने विमानच रद्द केले. आम्हाला कंपनीच्या प्रतिनिधींनी आठ तास मूर्ख बनविले. हवाई वाहतूक महासंचालनालयाने या प्रकरणी चौकशी करून प्रवाशांना न्याय मिळवून द्यावा. -प्रयेश बंधुवार, प्रवासी

निगडीत पाच बांगलादेशी नागरिक अटकेत

गोव्यातून पारपत्र काढल्याचे उघडकीस

पिंपरी : बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी नागरिकांना गुन्हे शाखेचे दहशतवादविरोधी पथक आणि निगडी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई निगडीतील अंकुश चौकात करण्यात आली. आरोपींपैकी तीन जणांनी गोवा येथून पारपत्र काढल्याचे समोर आले आहे. रॉकी सामोर बरूआ (वय २८), जयधन अमीरोन बरूआ (वय २८), अंकुर सुसेन बरूआ (वय २६), रातुल शील्फोन बरूआ (वय २८), राणा नंदन बरूआ (वय २५, सर्व रा. चित्तगोंग, बांगलादेश) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

जिकू दास ऊर्फ जॉय चौधरी (रा. चंदननगर, पुणे) हा फरार आहे. दहशतवादविरोधी पथकाचे पोलीस शिपाई सुयोग लांडे यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी हे बांगलादेशी नागरिक आहेत. त्यांनी बनावट जन्मदाखला आणि अन्य कागदपत्रांद्वारे आधारकार्ड तयार केले. त्यानंतर सर्वजण निगडी येथील साईनाथनगर येथील चाळीत राहत होते. या ठिकाणी त्यांनी आधारकार्डवरील पत्ते बदलून पुण्यातील पत्ते टाकले. बनावट कागदपत्रांद्वारे तीन आरोपींनी गोवा येथून पारपत्र काढून घेतले. अन्य दोन आरोपींचे पारपत्र तयार करण्याची प्रक्रिया सुरू होती. याबाबत दहशतवादविरोधी पथकाला माहिती मिळाली. त्यांनी छापा टाकून पाच आरोपींना अटक केली.

गुटखाबंदी यशस्वी का होत नाही?

भास्कर सदावर्ते

गुटखा आणि पान मसाला (प्रतिबंध) कायदा २०२० अन्वये संपूर्ण देशात बंदी लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने जुलै २०१२ पासून गुटखा आणि पान मसाला उत्पादन, विक्री आणि वितरणावर बंदी आणली. या कायद्यातील तरतुदीनुसार गुटख्याचे उत्पादन, जाहिरात आणि विक्री करणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरविण्यात आला असून दहा वर्षांपर्यंत शिक्षा आहे. भारतीय दंड संहितेतील ३२८ कलमानुसार (गंभीर दुखापत) कारवाई करावी, असे आदेश राज्याच्या पोलीस महासंचालकांनी प्रसृत केले असल्याने याआधीही हा गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र ठरला होता. प्रत्यक्षात इतर राज्यांत खुलेआम गुटखा उत्पादन व विक्री सुरू आहे. राज्यात बंदी असली तरी छुपेपणाने पान मसाला व गुटखा विक्री सुरू असते.

बंदी कोणी आणली? कोणी राबवायची?

गुटख्यामध्ये असंख्य प्रकारचे सूक्ष्म रासायनिक घटक असून त्यामुळे ककरोगाचा धोका वाढतो, अशी गंभीर बाब संशोधनात उघडकीस आली आहे. वाराणसीतील एका सर्वेक्षणानुसार, ककरोगाने मृत्यू पावलेल्या रुग्णांमध्ये तंबाखूसेवन करणा ्या ५५ टक्के नागरिकांचा समावेश असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळेच बंदी आणण्यात आली आहे. पान मसाला, तंबाखूजन्य पदार्थ हे अन्न या सदरात मोडत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्यामुळे गुटखाबंदी राबविण्याची जबाबदारी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनावर सोपविण्यात आली. अधूनमधून पोलिसांकडूनही गुटखा जप्त करण्याची कारवाई केली जाते. या कारवाईबाबत अन्न व औषध प्रशासनाला मर्यादा असल्याचे आढळून आले आहे. प्रभावी कारवाई होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

शिक्षा पुरेशी कडक आहे?

नियमाची अंमलबजावणी न करणा ्या उत्पादकाला पहिल्या गुन्ह्यासाठी दोन वर्षे किंवा ५० हजार रुपये दंड व नंतरच्या गुन्ह्यासाठी पाच वर्षांपर्यंत शिक्षा व एक लाख रुपये दंडाची शिक्षा आहे. ही शिक्षा २१ वर्षांखालील तरुणांना सिगारेट वा तंबाखू विक्री करण्यापेक्षा (१० व २० हजार रु. दंड) कडक आहे.

गुटखा-व्यसनी किती? उलाढाल किती?

देशात २७ कोटी लोक गुटख्याचे सेवन करतात, असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या एका अहवालात नमूद आहे. एका सर्वेक्षणानुसार, देशातील गुटखा सेवनाचे प्रमाण २० ते २५ टक्के असून गुजरातमध्ये सर्वाधिक (३३ टक्के), त्या खालोखाल ओडिसा (३१ टक्के), मध्य प्रदेश (२९.६ टक्के), उत्तर प्रदेश (२७.६ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. देशात १९ कोटी लोक गुटखा सेवन तर नऊ कोटी लोक तंबाखू सेवन करतात. अनधिकृत माहितीनुसार, भारतातील पान मसाला विक्रीची आर्थिक उलाढाल ४२ हजार कोटींच्या घरात आहे. २०२७ मध्ये तो आकडा ५३ हजार कोटींवर पोहोचेल, असा विश्वास या उद्योगाचा आहे.

कारवाईची जबाबदारी कोणाची?

कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनावर आहे. या कारवाईसाठी या अधिका ्यांना पोलिसांची मदत घेता येते. परंतु प्रशासनाकडे राज्यभरात फक्त १४० अधिकारी आहेत. प्रत्यक्षात पदे ३०० च्या आसपास आहेत. गुटखाबंदीची कारवाई पोलिसांनाही थेट करता येते. मध्यंतरी गुन्हे अन्वेषण विभागाच्या वांद्रे युनिटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व दया नायक यांनी पालघरजवळ गुटखा घेऊन येणारे दोन मोठे ट्रक जप्त केले. या ट्रकमध्ये नऊ कोटी रुपये किमतीचा गुटखा आढळून आला. त्याआधी अंधेरीतून एक कोटीचा गुटखा हस्तगत करण्यात आला होता.

बंदीला यश का मिळत नाही?

गुटखाविरोधी कारवाईसाठी अन्न व औषध या अधिकाऱ्यांनी कारवाई करण्यासाठी पोलिसांची मदत घ्यावी, असे आदेश आहेत, मात्र त्यांना अर्धा-पाऊण तास पोलीस ठाण्यात बसवून ठेवले जाते. त्यानंतर ते कारवाई करण्यासाठी जातात तेव्हा त्यांना गुटखा आढळत नाही. मात्र त्याच दुकानांवर काही वेळाने परस्पर कारवाई करण्याचे या अधिका ्यांनी ठरविले तर गुटखा आढळतो. गुटखाबंदी यशस्वी करण्यासाठी पोलीस प्रभावीपणे कारवाई करू शकतात वा अन्न व औषध प्रशासनाला ब ्याच वेळी दुकानदाराकडून वा स्थानिकांकडून दादागिरी वा हमरीतुमरीला सामोरे जावे लागते. अशा वेळी त्यांना पोलिसांची मदत आवश्यक असते. परंतु पोलिसांकडूनही कारवाईची माहिती आधीच या दुकानदारांना मिळत असल्यामुळे कारवाई यशस्वी होत नाही, असे या अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

सर्वोच्च न्यायालयाची राहुल नार्वेकरांना आमदार अपात्रता प्रकरणी नोटीस

नवी दिल्ली : जवळपास दोन आठवड्यांपूवी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी निकाल दिला. यामध्ये त्यांनी दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवलं. तसेच, शिंदे गटाचे व्हिप भरत गोगावले यांनाच वैध ठरवत त्यांच्याविरोधातील याचिका फेटाळल्या. यानंतर ठाकरे गटानं थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. यावर आता सर्वोच्च न्यायालयाने आता राहुल नार्वेकरांच्या नावे नोटीस बजावली आहे. या नोटिशीवर उत्तर देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नार्वेकरांना दोन आठवड्यांचा कालावधी दिला आहे.

ठाकरे गटाच्या बाजूने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल युक्तिवाद करत आहेत. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूती जे. बी. पादिर्वाला व न्यायमूती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीसाठी आली. यावेळी कपिल सिब्बल यांनी न्यायालयासमोर याचिकेचा उल्लेख केल्यानंतर न्यायालयाने खटला थेट सर्वोच्च न्यायालयात न चालवण्याऐवजी उच्च न्यायालयात चालवला जायला हवा का? अशी विचारणा केली. मात्र, त्यावर कपिल सिब्बल यांनी खटला सर्वोच्च न्यायालयात चालवण्याचीच विनंती केली.

या प्रकरणाचा निकाल देताना विधानसभा अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अवमान केला आहे. त्यामुळे या याचिकेवर इथेच सुनावणी व्हावीह्व, अशी भूमिका कपिल सिब्बल यांनी मांडली. अखेर न्यायालयाने राहुल नार्वेकरांच्या नावे नोटीस बजावली आसून त्यावर येत्या दोन आठवड्यांमध्ये उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.राहुल नार्वेकरांनी निकाल देताना भरत गोगावले यांची शिंदे गटानं शिवसेनेचे मुख्य व्हिप म्हणून केलेली नियुक्ती वैध ठरवली. त्यामुळे सुनील प्रभू यांनी उद्धव ठाकरेंन नियुक्त केलेले प्रतोद म्हणून बजावलेला व्हिप नार्वेकरांनी अवैध ठरवला. तसेच, भरत गोगावले यांनी बजावलेला व्हिपदेखील तांत्रिकदृष्ट्या अपूर्ण असल्याचं नमूद करत त्यांनी ठाकरे गटाच्या आमदारांनाही अपात्र ठरवण्यास नकार दिला.

धर्मो रक्षिति रक्षित:

सौ.भारती सावंत

श्रीराम मंदिराचा उद्घाटन सोहळा कालच मोठ्या उत्साहात जगभर साजरा झाला. यानिमित्ताने एकंदरच सर्वत्र हिंदू सश्रद्धांच्या आनंदास उधाण आलेले आहे आणि अनेकांच्या मनात स्वप्नपूतीची भावना आहे. या स्वप्नपूतीच्या श्रेयाचे मानकरी या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याही मनात कृतकृत्यतेची भावना दाटून आली असणार. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यामुळे भाजपची तीन प्रमुख स्वप्ने होती. जम्मू-काश्मिरातून अनुच्छेद ३७० चे उच्चाटन, राम मंदिराची उभारणी आणि समान नागरी कायदा. यातील पहिल्या दोनांची पूर्तता मोदी यांच्या हस्ते झाली आणि तिसऱ्यासही ते निर्विवाद हात घालतील. संघाच्या आणि म्हणून भाजपच्याही विरोधकांस हे सगळे व्यर्थ, निरुपयोगी आणि भावना उद्दीपित करणारे वाटू शकेल. त्यांनी तसे वाटून घेण्यात अगदीच तथ्य नाही असे नाही. तथापि देशातील बहुसंख्यांना आपल्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होते असे वाटत असेल आणि त्या वाटण्यास खतपाणी घालणारी परिस्थिती निर्माण होत असेल तर यातही तथ्य नाही असे म्हणता येणार नाही. धर्म ही संकल्पना व्यक्तिसापेक्ष असते आणि ती त्या त्या व्यक्तीने स्वतःच्या घराच्या उंबरठ्याबाहेर आणू नये हे आदर्श तत्त्व. तथापि काही धर्मीयांबाबत- आणि त्यातही विशेषतः इस्लाम- या आदर्श तत्त्वास सोयीस्कर तिलांजली दिली जाते असे बहुसंख्य हिंदू धर्मीयांस वाटू लागले असेल आणि त्यातून त्यांच्या धर्मभावना अधिक चेतवल्या गेल्या असतील तर ते का, कसे आणि कोणामुळे झाले याचाही विचार यानिमित्ताने केला जाणे आवश्यक ठरेल. समाजकारणात सर्वधर्मसमभाव/ निधर्मिकता अत्यावश्यक याबाबत तिळमात्रही संदेह नाही. तथापि जॉर्ज ऑर्वेलच्या ॲनिमल फार्ममध्ये ज्याप्रमाणे कायद्यासमोर सर्व समान असले तरी काही अधिक समान असतात हे सत्य धर्माबाबतही दिसून येत असेल तर कालांतराने त्या धमीयांच्या भावनेचा प्रस्फोट होतो. तसा तो आपल्याकडे झाला आणि त्यातून भाजप अधिकाधिक सुदृढ होत गेला. त्या सुदृढतेच्या भावनेचे प्रतीक म्हणजे आज उद्घाटन झालेले अयोध्येतील राम मंदिर.

राम-कृष्ण-शिव या त्रिकुटाचे गारूड भारतीय मनावर किती व्यापक आहे हे उलगडून दाखवणारा राममनोहर लोहिया यांचा लेख ह्यलोकसत्ताह्न रविवारी पुनर्प्रकाशित केला. लोहिया हे समाजवादी विचारधारेचे. तरीही राम-कृष्णाचे सांस्कृतिक महत्त्व मान्य करण्याच्या आड त्यांची विचारधारा आली नाही. याचे कारण राम-कृष्ण-शिव आदी ही भारताची सांस्कृतिक प्रतीके आहेत हे त्यांना मान्य होते आणि सांस्कृतिक प्रतीकांस राजकारणात ओढण्याची गरज नसते हा समंजसपणा सवर्मान्य होता त्या काळात ते राजकारणात होते. तो नंतर लोपला. पुढे मूळच्या काँग्रेसवासी असलेल्या हिंदू (हिंदुत्ववादी नव्हे) नेत्यांस स्वतःची वेगळी चूल मांडण्याची गरज वाटली. अशी हिंदू गरज ही नेहमी प्रतिक्रियारूपी आहे, हे सत्य यानिमित्ताने लक्षात घ्यायला हवे. म्हणजे आधी मुस्लीम लीगची स्थापना झाली. हिंदू महासभा आणि रा. स्व. संघ हे नंतर आले. हिंदू महासभा ही मुस्लीम लीग निमितीची पहिली प्रतिक्रिया. पुढे ही महासभाही पुरेशी हिंदू नाही असे वाटल्याने रा. स्व. संघ तयार झाला. मुसलमानांच्या क्रियेवर हिंदूंची प्रतिक्रिया उमटण्याचा इतिहास आजतागायत तसाच सुरू आहे. यावर ह्यतेह्न तसे वागले म्हणून आपणह्न असे वागावे का, असा प्रश्न उपस्थित होतो. तो योग्यच. पण या प्रश्नाचे उत्तर नाही देण्यास आवश्यक बौद्धिक उंचीवर बहुसंख्य सामान्य कदाचित पोहोचू शकत नसावेत. अशा सर्वास विजय दृश्य स्वरूपात असावा लागतो. याचे साधे कारण म्हणजे भक्ती नवविधा असल्याचे हिंदू धर्मच सांगत असला तरी बहुसंख्यांची हयात प्रतीक-पूजेच्या पहिल्या विधी-पायरीवरच संपते. त्यांच्यासाठी अशी प्रतीके आणि त्या प्रतीकांचा विजय, त्यांची भव्यता सुखावणारी असते. उसकी कमीज मेरी कमीज से सफेद कैसे ही भावना धर्मक्षेत्रातही असते हे विसरून चालणार नाही.

हे असे हिंदू धर्माच्या तात्त्विक, बौद्धिक विशालतेशी अवगत नसतात. त्यांस ही विशालता कधीही स्पर्शणार नसते. वेदपुराणांच्या गौरवगानात मग्न असलेले भारतीयसुद्धा दार्शनिकतेविषयी, त्यातील प्रश्न विचारण्याच्या महत्तेविषयी अनभिज्ञ असू शकतात. हे सर्व निर्माण व्हायच्या आधी काय होते या प्रश्नाचे उत्तर विधात्यासच ठाऊक असेल.. असे सांगणारा ऋग्वेद त्याच ओळीत ह्यह्य.. कदाचित त्यालाही हे माहीत नसेल, असे म्हणण्यास मागेपुढे पाहात नाही. हिंदू धर्मात अश्रद्धांचाही श्रद्धावानांइतकाच आदर केला जातो आणि नास्तिकासही आस्तिकासारखेच वंदन केले जाते हे या सर्वास माहीतही नसते. त्याच वेळी आपल्या उपेक्षांसाठी परदेशांतून आलेल्या धर्मीयांस- म्हणजे ख्रिश्चन आणि मुसलमानांस- बोल लावताना हिंदू धर्म इतका सर्वसमावेशक होता तरी जैन, बौद्ध वा शीख धर्म या मातीत तयार का झाले हे प्रश्न यांतील अनेकांस पडत नाहीत. खुद्द हिंदू धर्मातील अनेकांवर धर्मत्यागाची वेळ का आली हा प्रश्नही यांतील अनेकांस भेडसावत नाही. अयोध्येत आज राम मंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर अथवा काशी-मथुरा वा सोमनाथ येथेही अशी भव्य मंदिरे उभारली गेल्यानंतर कदाचित या सगळ्याची जाणीव होऊ शकेल. या मंदिर निमितीमुळे अयोध्येचा होऊ घातलेला कायापालट अन्यत्रही अशा मंदिर उभारणीच्या रेटयास गती देईल.

यानिमित्ताने धार्मिक पर्यटनाचे महत्त्व सांगितले जात आहे. ते खरे आहे. संस्कृतीचा विकास धर्मक्षेत्रांभोवती झाला आणि ही धमकेंद्रे आर्थिक विकासाची गंगोत्रीही बनली हे खरेच. पण हेही खरे की केवळ धमकेंद्र आहे हे निमित्त सर्वांगीण प्रगतीसाठी पुरेसे नसते. तसे असते तर मक्का-मदिना ही इस्लामची पवित्र धमकेंद्रे सौदी अरेबियास आर्थिक महासत्ता बनवू शकली असती. व्हॅटिकन आणि पोपचे वास्तव्य आहे या केवळ एकाच कारणासाठी इटली इतिहासात महासत्तापदी पोहोचली नाही. धमकेंद्रांभोवती धार्मिक सलोख्याचे आणि खऱ्या अथी सर्वधर्मसमभावाचे वातावरण सर्वंकष प्रगतीसाठी आवश्यक असते. तसे नसेल तर धमकेंद्र हे केवळ त्या त्या धमीयांसाठी श्रद्धास्थान इतक्यापुरतेच मर्यादित राहते. रोम आणि मक्का-मदिना यांतील फरक हे सत्य दाखवतो. हॉटेले, बँका, वित्त सेवा, पर्यटन व्यावसायिक यांच्यात सध्या अयोध्यावासी होण्यासाठी दिसून येत असलेली लगबग कौतुकास्पद खरीच. पण तीस धार्मिक सौहार्द, उत्तम पायाभूत सोयी आणि त्याहीपेक्षा सुसंस्कृत वातावरण याचीही जोड मिळत राहील याची दक्षता धोरणकर्त्यांस घ्यावी लागेल. मंदिराच्या उद्घाटनाचा आनंदसोहळा शांत झाला, त्यामागील राजकीय निकड निवली की या मुद्द्यांकडेही लक्ष देण्यास संबंधितांस उसंत मिळेल.

राम-कृष्ण-शिव या त्रिकुटाचे गारूड भारतीय मनावर किती व्यापक आहे हे उलगडून दाखवणारा राममनोहर लोहिया यांचा लेख ह्यलोकसत्ताह्न रविवारी पुनर्प्रकाशित केला. लोहिया हे समाजवादी विचारधारेचे. तरीही राम-कृष्णाचे सांस्कृतिक महत्त्व मान्य करण्याच्या आड त्यांची विचारधारा आली नाही. याचे कारण राम-कृष्ण-शिव आदी ही भारताची सांस्कृतिक प्रतीके आहेत हे त्यांना मान्य होते आणि सांस्कृतिक प्रतीकांस राजकारणात ओढण्याची गरज नसते हा समंजसपणा सवर्मान्य होता त्या काळात ते राजकारणात होते. तो नंतर लोपला. पुढे मूळच्या काँग्रेसवासी असलेल्या हिंदू (हिंदुत्ववादी नव्हे) नेत्यांस स्वतःची वेगळी चूल मांडण्याची गरज वाटली. अशी हिंदू गरज ही नेहमी प्रतिक्रियारूपी आहे, हे सत्य यानिमित्ताने लक्षात घ्यायला हवे. म्हणजे आधी मुस्लीम लीगची स्थापना झाली. हिंदू महासभा आणि रा. स्व. संघ हे नंतर आले. हिंदू महासभा ही मुस्लीम लीग निमितीची पहिली प्रतिक्रिया. पुढे ही महासभाही पुरेशी हिंदू नाही असे वाटल्याने रा. स्व. संघ तयार झाला. मुसलमानांच्या क्रियेवर हिंदूंची प्रतिक्रिया उमटण्याचा इतिहास आजतागायत तसाच सुरू आहे. यावर ते तसे वागले म्हणून आपण असे वागावे का, असा प्रश्न उपस्थित होतो. तो योग्यच. पण या प्रश्नाचे उत्तर नाही देण्यास आवश्यक बौद्धिक उंचीवर बहुसंख्य सामान्य कदाचित पोहोचू शकत नसावेत. अशा सर्वास विजय दृश्य स्वरूपात असावा लागतो. याचे साधे कारण म्हणजे भक्ती नवविधा असल्याचे हिंदू धर्मच सांगत असला तरी बहुसंख्यांची हयात प्रतीक-पूजेच्या पहिल्या विधी-पायरीवरच संपते. त्यांच्यासाठी अशी प्रतीके आणि त्या प्रतीकांचा विजय, त्यांची भव्यता सुखावणारी असते. ह्यउसकी कमीज मेरी कमीज से सफेद कैसेह्न ही भावना धर्मक्षेत्रातही असते हे विसरून चालणार नाही.

हे असे हिंदू धर्माच्या तात्त्विक, बौद्धिक विशालतेशी अवगत नसतात. त्यांस ही विशालता कधीही स्पर्शणार नसते. वेदपुराणांच्या गौरवगानात मग्न असलेले भारतीयसुद्धा दार्शनिकतेविषयी, त्यातील प्रश्न विचारण्याच्या महत्तेविषयी अनभिज्ञ असू शकतात. ह्यह्ये सर्व निर्माण व्हायच्या आधी काय होते या प्रश्नाचे उत्तर विधात्यासच ठाऊक असेल.. असे सांगणारा ऋग्वेद त्याच ओळीत कदाचित त्यालाही हे माहीत नसेल, असे म्हणण्यास मागेपुढे पाहात नाही. हिंदू धर्मात अश्रद्धांचाही श्रद्धावानांइतकाच आदर केला जातो आणि नास्तिकासही आस्तिकासारखेच वंदन केले जाते हे या सर्वास माहीतही नसते. त्याच वेळी आपल्या उपेक्षांसाठी परदेशांतून आलेल्या धमीयांस- म्हणजे ख्रिश्चन आणि मुसलमानांस- बोल लावताना हिंदू धर्म इतका सर्वसमावेशक होता तरी जैन, बौद्ध वा शीख धर्म या मातीत तयार का झाले हे प्रश्न यांतील अनेकांस पडत नाहीत. खुद्द हिंदू धर्मातील अनेकांवर धर्मत्यागाची वेळ का आली हा प्रश्नही यांतील अनेकांस भेडसावत नाही. अयोध्येत आज राम मंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर अथवा काशी-मथुरा वा सोमनाथ येथेही अशी भव्य मंदिरे उभारली गेल्यानंतर कदाचित या सगळ्याची जाणीव होऊ शकेल. या मंदिर निमितीमुळे अयोध्येचा होऊ घातलेला कायापालट अन्यत्रही अशा मंदिर उभारणीच्या रेटयास गती देईल.

यानिमित्ताने धार्मिक पर्यटनाचे महत्त्व सांगितले जात आहे. ते खरे आहे. संस्कृतीचा विकास धर्मक्षेत्रांभोवती झाला आणि ही धमकेंद्रे आर्थिक विकासाची गंगोत्रीही बनली हे खरेच. पण हेही खरे की केवळ धमकेंद्र आहे हे निमित्त सर्वांगीण प्रगतीसाठी पुरेसे नसते. तसे असते तर मक्का-मदिना ही इस्लामची पवित्र धमकेंद्रे सौदी अरेबियास आर्थिक महासत्ता बनवू शकली असती. व्हॅटिकन आणि पोपचे वास्तव्य आहे या केवळ एकाच कारणासाठी इटली इतिहासात महासत्तापदी पोहोचली नाही. धमकेंद्रांभोवती धार्मिक सलोख्याचे आणि खऱ्या अथी सर्वधर्मसमभावाचे वातावरण सर्वंकष प्रगतीसाठी आवश्यक असते. तसे नसेल तर धमकेंद्र हे केवळ त्या त्या धमीयांसाठी श्रद्धास्थान इतक्यापुरतेच मर्यादित राहते. रोम आणि मक्का-मदिना यांतील फरक हे सत्य दाखवतो. हॉटेले, बँका, वित्त सेवा, पर्यटन व्यावसायिक यांच्यात सध्या अयोध्यावासी होण्यासाठी दिसून येत असलेली लगबग कौतुकास्पद खरीच. पण तीस धार्मिक सौहार्द, उत्तम पायाभूत सोयी आणि त्याहीपेक्षा सुसंस्कृत वातावरण याचीही जोड मिळत राहील याची दक्षता धोरणकर्त्यांस घ्यावी लागेल. मंदिराच्या उद्घाटनाचा आनंदसोहळा शांत झाला, त्यामागील राजकीय निकड निवली की या मुद्दयांकडेही लक्ष देण्यास संबंधितांस उसंत मिळेल.

पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो रामभक्तांचे सामूहिक रामरक्षा पठण

पिंपरी : अयोध्येतील राम मंदिर उद्घाटन आणि मंदिरात विधिवत प्रभू श्रीरामाच्या मूतीची प्राणप्रतिष्ठा केली जात आहे. यानिमित्त चिंचवड येथे सामूहिक श्री रामरक्षा स्तोत्र पठण घेण्यात आले. त्यामध्ये पिंपरी-चिंचवडमधील शेकडो रामभक्तांनी व विद्यार्थ्यांनी सामूहिक रामरक्षा स्तोत्र पठण केले. चिंचवडगाव, केशवनगर येथील श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी क्रीडांगण येथे हा उपक्रम पार पडला. या सोहळ्याला प्रसिद्ध निवेदक व अभिनेते राहुल सोलापूरकर, पद्मश्री गिरीश प्रभुणे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, संस्कृती संवर्धन व विकास महासंघाचे अध्यक्ष हभप किसन महाराज चौधरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल, जिल्हा कार्यवाह माहेश्वर मराठे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री धनंजय गावडे आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल सोलापूरकर म्हणाले की, अयोध्येचा इतिहास फार जुना आहे. अनेक मुस्लिम राजांनी अयोध्येवर आक्रमणे केली. रामजन्मभूमीसाठी इसवी सनपूर्व १५० पासून ८९ लढाया झाल्या आहेत. साडेचार लाख रामभक्तांनी बलिदान दिलेले आहे. आपली आहुती दिलेल्या रामभक्तांचे आपण सर्वांनी स्मरण केले पाहिजे. अयोध्या ही अमृत भूमी आहे. युद्ध करूनही जिंकता येत नाही, अशी ती भूमी आहे. १६ व्या शतकात बाबराने अयोध्येवर हल्ला केला. त्याने राम मंदिराच्या ठिकाणी मस्जिद उभारली. रामजन्मभूमीचा लढा शेवटी न्यायालयामार्फत जिंकावा लागला. प्रभू श्रीराम मर्यादा पुरूषोत्तम होते. आता अयोध्येत राम मंदिर उभे राहिले आहे.

दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS

पाहिजेत

पत्रकारितेतील मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH) नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी दै. राजदंडचे व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दै. राजदंडमध्ये संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

कल्पना सुर्वे,
संचालक, (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

विविध कार्यकारी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न करणार- सहकार मंत्री

पुणे - विविध कार्यकारी सहकारी पतसंस्था ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना, नागरिकांना पतपुरवठा करण्यात महत्वाची भूमिका बजावत असल्याने या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.

शिरूर मधील कान्हूर मेसाई येथे कान्हूर मेसाई विविध सहकारी संस्थेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन व भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या निधीतून बांधण्यात आलेल्या स्वागत कमानीचे उद्घाटन प्रसंगी वळसे पाटील बोलत होते. यावेळी सहायक निबंधक अरुण साकोरे, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, आबा कोकरे, संस्थेचे संचालक, सरपंच अमोल थिटे, ग्रामपंचायत सदस्य, गावातील नागरिक उपस्थित होते.

कान्हूर मेसाई विविध सहकारी संस्थेचे कामकाज अतिशय चांगले होत असून संस्था नफ्यात आहे. संस्थेने स्वतःच्या निधीतून ३४ लाख रुपयांचा निधी नवीन इमारतीसाठी जमा केला असल्याचे सांगून वळसे पाटील म्हणाले, आज सहकार क्षेत्रात अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होताना दिसत आहेत. अनेक संस्था चुकीच्या पद्धतीने कामे केल्याने आर्थिक अडचणीत आल्या आहेत. असे प्रकार टाळण्यासाठी संस्थेच्या संचालक मंडळाने पारदर्शक कामे करावीत.

शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवती सहकारी बँकेच्या माध्यमातून पीक कर्ज, मध्यम मुदतीचे कर्जाचे वाटप होत आहे. पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बँक ही जुनी बँक आहे. १९९० साली या बँकेच्या साडेतीनशे कोटी ठेवी होत्या त्या आता १२ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. बँकेचे कामकाज अतिशय सुस्थितीत चालले आहे. त्याच धतीवर विविध कार्यकारी सहकारी संस्थेचेदेखील कामकाज सुस्थितीत चालणे गरजेचे आहे. ही समाजाची संस्था असल्याने ती टिकली पाहिजे.

केंद्र शासनाने त्यांच्या उद्योग धोरणात १५२ प्रकारचे विविध व्यवसाय करण्याची परवानगी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिली आहे. संस्थानी नागरिकांना कर्ज वाटप करण्याबरोबरच या व्यवसायात उतरून आर्थिक सक्षम व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी मिडगुलवाडी येथील नव महिला उत्पादक गटांनी तयार केलेल्या वस्तूंची वळसे पाटील यांनी पाहणी केली.

हडपसरमध्ये प्रभु श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा आनंदोत्सव जल्लोषात साजरा

लाडू, पेढे वाटून तसेच ढोलताशांच्या गजरात श्रीरामाची मिरवणूक

हडपसर : अवघ्या देशाचे लक्ष आयोध्या धाम तीर्थक्षेत्र येथील प्रभु श्रीराम जन्मभूमी येथील मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा कडे लागलेले असताना, प्राणप्रतिष्ठा सोहळा चालू असताना हडपसर भागात ठिकठिकाणी प्रभु श्रीरामाची पुजा अर्चा, करुन प्रभु श्रीरामाची व हनुमान यांची ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढून, पेढे लाडू वाटून प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा नागरिकांकडून जल्लोष करण्यात आला. जिकडे तिकडे भगवे ध्वज लावलेले दिसत होते, जय जय श्रीरामाच्या घोषणा ऐकायला येत होत्या, हडपसर गावात सर्व पक्षीय नेत्यांनी हडपसर मध्ये प्रभु श्रीरामाच्या घोषणा देत सोहळा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

भाजप माजी नगरसेवक, कारसेवक मारुती आबा तुपे यांनी ठिकठिकाणी भगवे ध्वज लावून, पालखीत प्रभु श्रीरामाची मिरवणूक काढून, श्रीराम मंदिर स्वच्छता करुन, नाचून, लाडू वाटप करीत एकच जल्लोष केला त्यांच्या समवेत भाजप पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते, महंदवाडी भागात शिवसेना शहरप्रमुख प्रमोद भानगिरे यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करित सोहळा उत्सव साजरा केला.

हडपसर गावात सर्व पक्षीय नेते उपस्थित होते, यात आमदार चेतन तुपे, माजी नगरसेवक योगेश ससाणे, सुनिल बनकर,

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार महादेव बाबर, संजय सपकाळ, काँग्रेस पक्षाचे प्रशांत सुरसे, सागरराजे भोसले, नितीन आरु, भाजपचे सुभाष जंगले, भाजपचे हणमंत घुले, भाजप हडपसर विधानसभा युवा अध्यक्ष बाळासाहेब घुले, अतुल तरवडे साउंड लावून, लाडू वाटप करुन प्रभु श्रीराम प्राणप्रतिष्ठा उत्सव साजरा केला.

वानवडीत भाजपाचे पुणे शहर सरचिटणीस महेश पुंडे, माजी नगरसेविका कालिंदा पुंडे यांनी चौक रस्त्यावर भगव्या पताका, प्रभु श्रीरामाचे मोठा बॅनर लावून, पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

बी.टी.कवडे रोड वर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युवा नेते विशाल कवडे यांनी बी.टी. कवडेरोड भागात लाडू वाटप करुन रामल्ला प्रभु श्रीराम प्राणप्रतिष्ठा आनंदोत्सव साजरा केला.

रामटेकडीत व रामटेकडीवरील मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा साजरा करण्यात आला.

दत्ता कांबळे, वामन धाडवे, अरुण आल्हाट उपस्थित होते.

हडपसर भागात रामटेकडी, वानवडी, घोरपडी, मुंढवा, केशवनगर, मांजरी, पंधरानंबर, मगरपट्टा, काळेपडळ, वैदवाडी, शिंदेवस्ती, महंमदवाडी, हांडेवाडीरोड, उंड्री, चिंतामणीनगर आदी भागात प्रभु श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हडपसर भागातील वातावरण प्रभु श्रीराम मय झाले होते.

श्रीराम प्रतिष्ठापने निमित्त बारामतीत जल्लोष फटाक्यांची आतषबाजी; बारामती भगवीमय

बारामती : अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे बारामतीत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष करण्यात आला.

बारामती शहरात ठीक ठिकाणी भगवे ध्वज उभारून विविध इमारतींवर तसेच घरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच घरांच्या अंगणात रांगोळी काढण्यात आली होती.

बारामतीतील ऐतिहासिक देवळ यांच्या श्रीराम मंदीरात बारामती हायटेक टेक्स्टाईल पार्कच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते आरती करण्यात आली. या प्रसंगी योजना देवळे, नेहा देवळे, पूजा देवळे, किशोर देवळे, मकरंद देवळे, ओंकार देवळे उपस्थित होते.

बारामती शहरातील भिगवण चौकात श्रीरामाची भव्य मूती उभारण्यात आली होती. या मूतीचे दर्शन घेण्यासाठी राम भक्तांनी मोठी गदी केली. अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदीरात महिलांनी सुंदरकांड वाचन केले. त्या नंतर श्रीरामाचा जयघोष करण्यात आला. हनुमा चालिसा पठण व श्रीरामांची आरती केली गेली. मंदीरामध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती, मंदीरावर रोषणाई केली गेली. रामनामाच्या जपाने मंदीराचा परिसर दुमदुमला होता. शहरात असंख्य ठिकाणी भगवे झेंडे डौलाने फडकत होते. शहरातील घरांसह, संस्था व जागोजागी भगवे झेंडे लावलेले होते. अनेक ठिकाणी भव्य फलक लावलेले होते. शहरातील महत्वाच्या चौकात कमानी उभारण्यात आल्या होत्या. अनेक मंडळे व कार्यकर्त्यांनी लाडू व पेढ्यांचेही वाटप केले. काही ठिकाणी दुकानदारांनी अयोध्येतील सोहळ्याचे प्रक्षेपण टीव्हीवर दाखविण्याची सोय केली होती.

दरम्यान अयोध्येतील प्रभु श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेच्या धतीवर अवघी बारामती नगरी प्रभू श्रीरामांच्या भक्तीमय रंगात रंगून गेल्याचे चित्र शहरांमध्ये पाहायला मिळत आहे. शहरांतील रस्त्यावर अनेक ठिकाणी प्रभू श्रीराम यांच्या प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमाचे स्वागताचे बॅनर, कमानी भगवे ध्वज, पताका, आकाश कंदील लावल्याने शहरातील वातावरण भगवेमय झाले यावेळी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच अनेक मंडळांच्या कार्यकर्त्यांनी शहरात घरोघरी जाऊन लाडूचा प्रसाद वाटला.

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी ब्लॉक

पुणे -यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत २३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ ते दुपारी २ वाजेदरम्यान हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत मुंबई वाहिनीवर कि.मी २४.२५० व पुणे वाहिनीवर कि.मी ५६.९०० (कुसगाव वाडी) येथे गॅन्ट्री उभारण्याचे काम करण्यात येणार असल्याने या कालावधीत वाहतूक वळविण्यात आली आहे. पुण्याहुन मुंबईकडे जाणारी हलकी वाहने मुंबई वाहिनीवर लेन कि.मी ५५.००० वरून वळवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ जुना पुणे मुंबई महामार्गावरून मार्गस्थ होतील. पुण्याहुन मुंबईकडे जाणारी हलकी वाहने व बसेस खोपोली एक्झिट कि .मी ३९.८०० येथून वळवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ जुना पुणे मुंबई महामार्गावरून खोपोली शहरातून पुढे शेडुंग टोलनाका मार्गे मुंबई वाहिनीवर मार्गस्थ होतील. पुण्याहुन मुंबईकडे जाणारी हलकी व जड -अवजड वाहने ही खालापूर टोल नाका, शेवटच्या लेनने खालापूर एक्झिट कि.मी ३२.५०० येथून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरून खोपोली शहरातून पुढे शेडुंग टोलनाका मार्गे मुंबई वाहिनीवर मार्गस्थ होतील. मुंबई- पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ या मार्गावरून पुणे बाजुकडून मुंबई बाजूकडे येणारी वाहने शेडुंग फाट्यावरून सरळ पनवेल दिशेने मार्गस्थ होतील. मुंबईहून पुण्याकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने किलोमीटर ५४.९०० येथील कुसगाव टोल नाका येथून वळवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ जुना पुणे मुंबई महामार्गावरून पुणे बाजूकडे वळविण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे कळविण्यात आले आहे.

रामवाडीपर्यंत मेट्रोला लवकरच हिरवा कंदील!

केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून अंतिम तपासणी पूर्ण

पुणे : पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील विस्तारित सेवा लवकरच सुरू होणार आहे. केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग यांनी या मार्गाची अंतिम तपासणी पूर्ण केली आहे. त्यांनी काही किरकोळ त्रुटी दूर करण्याचे निर्देश महामेट्रोला दिले असून, त्यानंतर या मेट्रो सेवेला अंतिम मंजुरी मिळणार आहे.

रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाची अंतिम तपासणी केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त गर्ग यांनी १९ जानेवारीपासून सुरू केली. त्यांनी ही तपासणी २१ जानेवारीपर्यंत पूर्ण केली. या तपासणीदरम्यान त्यांनी या मार्गातील काही त्रुटी उपस्थित केल्या. या त्रुटी दूर करून महामेट्रो त्याचा अहवाल आयुक्तांना पाठविणार आहे. त्यानंतर या मार्गाला अंतिम मंजुरी मिळणार आहे. आयुक्तांनी या मार्गाला हिरवा कंदील दिल्यानंतर महामेट्रोकडून मार्ग सुरू करण्याबाबत राज्य सरकारशी पत्रव्यवहार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार मार्ग सुरू करण्याची तारीख निश्चित करेल, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो तपासणी करण्यासाठी या महिन्यात सुरुवातीला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त कार्यालयाचे पथक पुण्यात आले होते. या पथकाने विस्तारित मार्गाची आठवडाभर तपासणी केली होती. या पथकाने काही त्रुटी काढल्या होत्या. त्या त्रुटी मेट्रोकडून दूर करण्यात आल्या होत्या. त्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त गर्ग हे या मार्गाच्या तपासणीसाठी पुण्यात दाखल झाले होते.

केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून रुबी हॉल ते रामवाडी मेट्रो मार्गाची अंतिम तपासणी पूर्ण झाली आहे. त्यांनी तपासणीदरम्यान काही किरकोळ त्रुटी काढल्या आहेत. या त्रुटी दूर करून त्याचा अहवाल चार-पाच दिवसांत आयुक्तांना पाठविण्यात येईल. त्यानंतर या मार्गाला अंतिम मंजुरी मिळेल.
-अतुल गाडगीळ, संचालक (कार्य), महामेट्रो

रुबी हॉल ते रामवाडी मेट्रो मार्ग

अंतर झ ५.५ किलोमीटर

स्थानके झ बंडगार्डन, येरवडा, कल्याणीनगर, रामवाडी

सुरू कधी झ फेब्रुवारीच्या सुरुवातीला शक्य

प्रभू श्री रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठानच्या सोहळ्याचे औचित्य साधून गीत रामायण भक्तिमय कार्यक्रम

ठाणे : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे व कल्याण लोकसभेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून प्रभू श्री रामाच्या प्राण प्रतिष्ठापना सोहळ्याचे औचित्य साधून चावंडाई मंदिर, पारसिकनगर येथे महाआरती करण्यात आली. तसेच खारीगाव-पारसिकनगर मधील राम भक्तांसाठी गायक उमेश सुतार यांचा गीतरामायण भक्तीसंगीताचा कार्यक्रम आयोजन करण्यात आले तसेच प्रभू श्री राम चंद्राची एलईडी लाईट असलेल्या प्रतिमेचे उद्घाटन मा. नगरसेवक श्री. उमेश पाटील व शिवसेना नेते दशरथ दादा पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले त्याप्रसंगी उपमहापौर पल्लवी कदम, कळवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक कन्हैयालाल थोरात साहेब, माजी नगरसेवक शाम पाटील, माजी नगरसेवक दिनेश कांबळे, ठाणे शहर संघटक नरेंद्र शिंदे, युवा नेते राकेश पाटील, उपविभागप्रमुख रविंद्र पाटील, विभागप्रमुख विजू शिंदे, गजानन पवार, मनोज पाटील, सचिन पाटील, शाखाप्रमुख राधेय वराडकर, गणेश बोऱ्हाडे, रवी भोईर, रविंद्र जावळे, संदीप पाटील, पूनम पाटील, सुजय पाटील, कुणाल म्हात्रे, समाजसेविका रचना पाटील, सौ. शारदा पाटील, महिला विभाग संघटक अचर्ना पाटील, शाखा संघटक निमर्ला कदम, उपशाखा संघटक रेखा रहाटे, उपशाखा संघटक स्मिता आयरे, उपशाखा संघटक प्रियांका भरम व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीफळ

‘श्री’ म्हणजे सर्व प्रकारचे वैभव. नारळ हे उत्कृष्ट मनोवैभवाचे, गुणवैभवाचे प्रतीक आहे. कुरूपता व सुंदरता, कठोरता व मृदुता यांचा सुरेख संगम म्हणजे श्रीफळ. जीवनात येणाऱ्या अनेक द्वंद्वांचा योग्य समन्वय साधून, योग्य कृती करून जो ‘यशश्री’ किंवा ‘विजयश्री’ प्राप्त करतो तोच महान बनतो. महर्षी ‘अष्टावक्र’ एकदा जनक राजाच्या दरबारात गेले (त्यांचे शरीर आठ ठिकाणी वक्र होते. म्हणून त्यांना अष्टावक्र म्हणत असत.) त्यांच्या देहाची ती वक्रता पाहून राजदरबारात बसलेले विद्वान मोठमोठ्याने हसू लागले. ते पाहून अष्टावक्रही हसू लागले. जनकराजाने विद्वानांना हसण्याचे कारण विचारले. विद्वान म्हणाले, यांच्या शरीराची वक्रता पाहून आम्हाला हसू आले. मग राजाने ‘अष्टावक्रां’ना हसण्याचे कारण विचारले.

तेव्हा ते म्हणाले, राजा, तुझ्यासारख्या गुणग्राही राजाच्या दरबारात मूर्ख लोकांना बसलेले बघून मला हसू आवरले नाही. जनकाने विचारले, म्हणजे काय? अष्टावक्र म्हणाले, विद्वानांजवळ अंतसौंदर्य पाहण्याचा डोळा असावा लागतो. तो यांच्याजवळ नाही. यांनी माझे गुणसौंदर्य, विचारसौंदर्य, जीवनसौंदर्य, बुद्धिसौंदर्य पाहिलेच नाही. त्यांनी माझी बाह्यकुरूपता तेवढी पाहिली. बाह्यसौंदर्य किंवा बाह्यकुरूपता पाहण्याचे काम मुर्खाचे असते. विद्वानांचे नाही. मी यांच्या मूर्खपणाला हसलो.

बाह्यसौंदर्य मिळणे किंवा न मिळणे हे माणसाच्या हातात नसते. पण स्वतःचे अंतसौंदर्य तो स्वकष्टाने फुलवू शकतो, खुलवू शकतो. अंतसौंदयार्पुढे बा‘सौंदर्य गौण असते. फक्त माणसाजवळ सौंदर्य निरखण्याचा डोळा असावा लागतो. बा‘सौंदर्याच्या अभावाचा कमीपणा न मानता नारळाने स्वतःचे अंतसौंदर्य खुलवले आहे, म्हणूनच त्याला ‘श्रीफळ’ हे नाव प्राप्त झाले आहे.

आज माणसाला चांगले असण्यापेक्षा चांगले दिसणे अधिक आवडू लागले आहे. चांगले दिसण्यासाठी तो प्रयत्न करतो. सौंदर्यप्रसाधने वापरतो, सल्ले घेतो, पार्लरमध्ये जाऊन पैसे खर्च करतो, पण चांगले बनण्यासाठी तेवढी काळजी, तेवढे कष्ट घेताना दिसत नाही. ‘श्रीफळ’ आपल्याला चांगले बनण्याची प्रेरणा देते. श्रीफळाची तुलना सज्जनांशी केली जाते. बाहेरून कठोर पण आतून अतिमृदु, कोमल, गोड असे श्रीफळ महापुरुषांची महानता समजवणारे प्रतीक आहे. नारळाप्रमाणे सज्जनही देखाव्याचा आग्रह धरत नाहीत. त्यामुळे त्यांना ओळखणे कठीण जाते. महापुरुष स्वतः चुकले तर आत्मशासन करण्यात वज्राहून कठोर होतात. पण इतरांना शिक्षा करताना किंवा चूक माफ करताना ते फुलाहून कोमल असतात.

‘श्री’ म्हणजे सर्व प्रकारचे वैभव. नारळ हे उत्कृष्ट मनोवैभवाचे, गणवैभवाचे प्रतीक आहे. कुरूपता व सुंदरता, कठोरता व मृदुता यांचा सुरेख संगम म्हणजे श्रीफळ. जीवनात येणाऱ्या अनेक द्वंद्वांचा योग्य समन्वय साधून, योग्य कृती करून जो ‘यशश्री’ किंवा ‘विजयश्री’ प्राप्त करतो तोच महान बनतो. त्याच्या जीवनाचा गौरव करताना, सत्कार करताना अन्य वस्तू (सन्मानचिन्ह, शाल पुष्पगुच्छ, मानपत्र, थैली इ.) असोत, नसोत ‘श्रीफळ’ हे अग्रस्थानी असते.

श्रीफळाशिवाय कोणाचाही सन्मान पूर्ण होऊ शकत नाही. प्रत्येक शुभकार्याची सुरुवात ‘श्रीफळ’ वाढवून केली जाते. धार्मिक कार्यातही श्रीफळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मंदिरातील देवासमोर नारळ फोडून अर्धा भाग प्रसाद म्हणून नेण्याची पद्धत आहे.

‘श्रीफळ’ हे बारमाही फळ आहे. नारळाच्या झाडाचा प्रत्येक भाग उपयोगी म्हणजे आर्थिक लाभ देणाराही आहे. त्या अर्थानेही ते ‘श्रीफळ’ आहे समुद्राच्या पाण्याचा खारटपणा स्वतः पिऊनही लोकांना गोड पाणी देणारे हे ‘श्रीफळ’ आपल्याला सांगते की, ‘विश्वातील खारटपणा हृदयात साठव व इतरांशी गोड वाग.’

कर्तव्यपालन करवंटीप्रमाणे कठोर राहा. पण अंतर्यामी खोबऱ्याप्रमाणे स्वच्छ व नरम राहा. श्रीफळाचा हा संदेश आचरणात आणून आपण खऱ्या अर्थाने ‘श्रीमान’ किंवा ‘श्रीमती’ बनू या.

फक्त २८८ रुपयांमध्ये २ महिन्यांचा रिचार्ज! रोज मिळेल २जीबी डेटा, पाहा डिटेल्स

BSNL
Connecting India

बीएसएनलनं दोन नवीन प्रीपेड प्लॅन्स सादर केले आहेत. यात ९१ रुपयांचा प्लॅन ७ तर २८८ रुपयांचा प्लॅन ६० दिवसांच्या वैधतेसह येतो.

भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनलन) नं आपल्या ग्राहकांसाठी दोन नवीन प्रीपेड प्लॅन सादर केले आहेत. या दोन प्लॅनची किंमत ९१ रुपये आणि २८८ रुपये आहे. तसेच, दोन्ही प्लॅन प्रीपेड डेटा व्हाउचर कॅटेगरीमध्ये आले आहेत, म्हणजे या प्लॅन्समध्ये ग्राहकांना फक्त डेटा बेनिफिट देण्यात आले आहेत. चला जाणून घेऊया या दोन्ही प्रीपेड डेटा व्हाउचरमध्ये ग्राहकांना कोणते बेनिफिट्स मिळतील.

बीएसएनलन ९१ रुपयांचा प्लॅन

सर्वप्रथम बीएसएनएलच्या ९१ रुपयांच्या प्लॅनची माहिती घेऊ, जो ७ दिवसांच्या व्हॅलिडिटीसह आला आहे. तसेच यात ग्राहकांना ७०० एसएमएससह ६०० एमबी डेटा मिळतो. प्लॅनमध्ये कोणतीही इतर बेनिफिट मिळत नाहीत. या प्लॅनचा वापर करण्यासाठी तुमच्याकडे एक ॲक्टिव्ह बेस प्रीपेड प्लॅन असणं आवश्यक आहे. तसेच ९१ रुपयांचा प्लॅन त्या ग्राहकांसाठी नाही ज्यांना जास्त डेटा हवा आहे. परंतु प्लॅनमध्ये असलेल्या ७०० एसएमएसचा देखील तुम्ही वापर करू शकता, जे बऱ्याचदा डेटा व्हाउचरमध्ये मिळत नाहीत.

बीएसएनलन २८८ रुपयांचा प्लॅन

बीएसएनएलच्या २८८ रुपयांच्या प्लॅनमध्ये ६० दिवसांची व्हॅलिडिटी मिळते. तसेच हा प्लॅन ग्राहकांना डेली २जीबी डेटा ऑफर करतो. तसेच डेली डेटा लिमिट संपल्यावर देखील ग्राहक ४० केबीपीएस स्पीडवर डेटा वापरू शकतात. डेटा लिमिट दरदिवशी रिफ्रेश होईल आणि तुमचा अनयूज्ड डेटा दिवसाच्या अखेरीस संपेल. तसेच दुसऱ्या दिवशी डेटा लिमिट पुन्हा २जीबी वर रिसेट होईल.

बीएसएनएलचे दोन्ही प्लॅन त्या ग्राहकांसाठी चांगले आहेत ज्यांना रोजचा डेटा संपल्यावर विना दिक्कत इंटरनेट वापरायचं आहे. जर तुम्हाला देखील प्लॅन मधील डेटा संपण्याची चिंता सतावत असेल तर तुम्ही या प्लॅन्सचा वापर करू शकता. परंतु तत्पूर्वी हे प्लॅन तुमच्या सर्कलमध्ये उपलब्ध आहेत की नाही ते एकदा कंपनीच्या वेबसाइटवर जाऊन चेक करा. हे प्लॅन्स तुमच्या सर्कलमध्ये उपलब्ध असल्यास तुम्ही यांचा लाभ घेऊ शकता.

* * *

स्वस्तात फोल्डेबल फोनची मजा हवी? टेक्नो फँटम वी२ फोल्ड झाला वेबसाइटवर लिस्ट

टेक्नोनं गेल्यावर्षी आपला फोल्डेबल डिवाइस टेक्नो फँटम वी फोल्ड लॉंच केला होता. तसेच, आता नवीन मॉडेल टेक्नो फैंटम वी फोल्ड लवकरच बाजारात येण्याची शक्यता आहे. मोबाइल बेंचमार्किंग वेबसाइट गीकबेंचवर प्रमुख स्पेसिफिकेशनसह दिसला आहे. चला, जाणून घेऊया समोर आलेल्या लिस्टिंग डिटेल्स.

टेक्नो फँटम वी२ फोल्ड गीकबेंच लिस्टिंग : टेक्नो चा नवीन फोल्डेबल फोन एई१० मॉडेल नंबरसह गीकबेंच डेटाबेसवर लिस्ट करण्यात आला आहे. फोनला सिंगल-कोर मध्ये १,२७३ आणि मल्टीकोर टेस्टमध्ये ३,८४४ स्कोर मिळाला आहे. डिवाइससाठी एक्सवायजी-मार्स कोडनेम असलेला मदरबोर्ड दिसला आहे. यात मीडियाटेक डायमेन्सिटी ९०००+ चिपसेट असू शकतो. लिस्टिंगनुसार डिव्हाइसमध्ये १२जीबी रॅम मिळेल. हा अँड्रॉइड १४ सह लॉंच होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

टेक्नो फँटम वी फोल्ड चे स्पेसिफिकेशन्स : टेक्नो फँटम वी फोल्ड दोन डिस्प्ले मिळतात, ज्यात ७.६५ इंचाचा एलटीपीओ ॲमोलेड प्रायमरी डिस्प्ले आहे. तर बाहेरच्या बाजूला ६.४२ इंचाचा फुलएचडी+ ॲमोलेड डिस्प्ले मिळतो. दोन्ही स्क्रीनवर १२०हर्ट्स रिफ्रेश रेट देण्यात आला आहे. पावर बॅकअपसाठी फोनमध्ये ४५वॉट फास्ट चार्जिंगसह ५,०००एमएएचची मोठी बॅटरी आहे.

टेक्नो फँटम वी फोल्ड ५जी मध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ९०००+ ऑक्टाकोर प्रोसेसर मिळतो. हा ३.२गिगाहर्ट्झ हाय क्लॉक स्पीडवर आधारित आहे. यात १२ जीबी एलपीडीडीआर५एक्स रॅम आणि ५१२ जीबी यूएफएस३.१ इंटरनल स्टोरेज मिळते.

फोटोग्राफीसाठी यात दोन फ्रंट कॅमेरा आणि रियर पॅनलवर ट्रिपल कॅमेरा सेटअप आहे. फोनच्या कव्हर स्क्रीनवर ३२एमपीचा आणि इनर स्क्रीनवर १६एमपीचा सेल्फी कॅमेरा आहे. तर मागे ५० मेगापिक्सलचा प्रायमरी, ५० मेगापिक्सलची पोर्ट्रेट टेलीफोटो आणि १३ मेगापिक्सलची अल्ट्रा वाइड अँगल लेन्स आहे.

टेक्नो फँटम वी२ फोल्ड १२जीबी रॅमसह सादर होऊ शकतो. यात मीडियाटेक डायमेन्सिटी ९०००+ चिपसेट मिळण्याची शक्यता आहे. हा एई१० मॉडेल नंबरसह गीकबेंच डेटाबेसवर लिस्ट करण्यात आला आहे.

लॉंचच्या वेळी याची किंमत ८८,८८८ रुपये होती, जी सॅमसंग आणि तर फोल्डेबल डिव्हाइस पेक्षा खूप स्वस्त होती. नवीन फोन देखील अशाच कमी किमतीत येईल अशी अपेक्षा आहे. आता ही किंमत किती असेल ते लॉंचनंतरच समजेल.

सतत जांभया येत आहेत? हे उपाय करून पाहा

झोप आली की अनेकांना एकामागून एक जांभया येतात. आळसामुळे जांभया येतात असा आपल्यातील अनेकांचा समज असतो. मात्र पुरेशी झोप न झाल्याने मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो आणि आपल्याला जांभया यायला लागतात. या जांभया इतक्या येतात की त्यांच्यावर नियंत्रण करणे अवघड होते. कधी एखाद्या तासाला बसलेलो असताना किंवा कधी ऑफीसच्या मिटिंगमध्ये जांभया येतात. अशी चारचौघात जांभयी आली की काय करावे ते आपल्यालाही कळत नाही. आता अशाप्रकारे वारंवार जांभया येऊ नयेत यासाठी काही खास गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते. पाहूयात काय आहेत या टिप्स...

सततच्या जांभयांनी हैराण झाले असाल तर डोक्यावर कोल्ड प्रेस ठेवा. यामुळे जांभया कमी होण्यास मदत होईल. शरीर थंड झाल्याने जांभयांचे प्रमाण कमी होते.

ऑक्सिजनच्या कमतरतेने जांभया येतात. त्यामुळे नाकाने दीर्घ श्वास घेऊन तोंडाने हळूहळू हा श्वास सोडल्यास जांभया कमी होण्यास मदत होते. मित्र-मैत्रिणींशी गप्पा मारणे, विनोदी व्हिडीओ पाहणे यांमुळे जांभया आणि आळस कमी होण्यास मदत होते. असे केल्यास झोप येण्यालाही प्रतिबंध होतो, असे एका संशोधनातून समोर आले आहे.

गुरुवारी ही १० कामे करू नका, नुकसान झेलावं लागेल

गुरुवारची प्रकृती क्षिप्र आहे. गुरुवार ब्रह्मा आणि बृहस्पतीचा वार आहे. भाग्य जागृत करण्यासाठी आणि दीर्घायु होण्यासाठी यादिवशी व्रत करण्याचे विधान आहे. यादिवशी देवदर्शनाचे देखील खूप महत्त्व आहे. पण काही कामे अशी आहे जी निषिद्ध आहेत-

१. यादिवशी शेव्हिंग करणे टाळावे. शरीराच्या कुठल्याही भागाचे केस कापू नये, नाहीतर संतान सुखात अडथळे येतात. या दिवशी नखे देखील कापू नये.

२. दक्षिण, पूर्व, नैऋत्य दिशेत प्रवास करणे वर्जित आहे. विशेष म्हणजे दक्षिण दिशेत दिशाशूल असतं. प्रवास करणे आवश्यक असल्यास दही किंवा जीरे खाऊन घराबाहेर पडावे.

३. गुरुवारी जेवण्यात वरुन मीठ वापरू नये. त्याने आरोग्यावर प्रभाव पडतो आणि प्रत्येक कार्यात अडथळे निर्माण होतात. मीठ खाल्ल्याने गुरू अस्त होतो.

४. या दिवशी दूध आणि केळी खाणे वर्ज्य मानले गेले आहे.

५. या दिवशी गुरू, देवता, वडील, आजोबा आणि धर्म यांचे अपमान करू नये.

६. या दिवशी कपडे धुणे वर्ज्य असतं.

७. या दिवशी लादी पुसणे टाळावे. असे केल्याने गुरू ग्रह अशुभ फल देतं.

८. या दिवशी खिचडी खाणे टाळावे.

९. गुरुवारी स्त्रियांनी केस धुवू नयेत. त्याने गुरू ग्रह कमजोर होतो आणि संपत्ती सुखात कमी येते.

१०. गुरुवारी पूजापाठ संबंधित सामान, डोळ्यांशी निगडित वस्तू, टोकदार वस्तू जसे चाकू, कातरी, भांडी खरेदी करू नये.

अवघ्या पाच मिनिटांत चेहरा टवटवीत करण्यासाठी टिप्स

तुमच्या कोमेजलेल्या आणि रॅशेस आलेल्या त्वचेला पुन्हा टवटवीत करण्यासाठी तुम्हाला पार्लरमध्ये जाऊन अनेक ब्युटी ट्रीटमेंट कराव्या लागतात. यासाठी बराच वेळ लागतो. मात्र, घाईच्या वेळेत हे सर्व करणे शक्य नसते. त्यामुळे अवघ्या पाच मिनिटांमध्ये तुमच्या थकलेल्या चेहऱ्याला टवटवीत करू शकणाऱ्या या खास टिप्स...

गुलाब पाणी : गुलाब पाणी म्हणजेच रोज वॉटरमध्ये त्वचा हायड्रेट आणि तजेलदार करण्याचा गुणधर्म असतो. कापसाचे लहान लहान गोळे गुलाब पाण्यात भिजत घालून त्याने चेहरा साफ करावा. गुलाब पाण्याने चेहरा साफ केल्याने चेहरा टवटवीत वाटतो. याशिवाय, गुलाबाच्या सुगंधामुळे दिवसभर ताजेतवाने वाटते आणि थकवा दूर होतो.

मधाचा फेसपॅक : मधामधील ब आणि क जीवनसत्व त्वचेसाठी फायद्याचे असते. मधाचे काही थेंब हातावर घेऊन फेसवॉशप्रमाणे चेहऱ्याला लावून थंड पाण्याने तोंड धुतल्यास ताजेतवाने वाटते. मधामुळे चेहऱ्यावर आलेली मरगळ लगेच गायब होते. त्वचेला ग्लो (तजेलदारपणा) आणण्यासाठी दही आणि मधाचे मिश्रण करून ते पाच मिनिटे चेहऱ्याला लावून ठेवावे. नंतर थंड पाण्याने चेहरा धुवावा. अवघ्या पाच मिनिटांमध्ये चेहऱ्यावर आलेला तजेलदारपणा लगेच दिसून येतो.

लिंबाचा फेसवॉश : लिंबाचा फेसवॉश त्वचेला फ्रेश करतो. त्याचबरोबर लिंबाच्या सुगंधामुळे दिवसभर टवटवीत वाटते.

पेट्रोलियम जेली : डोळ्यांच्या पापण्यांपासून वर आणि गालावर पेट्रोलियम जेली लावल्याने फ्रेश झाल्यासारखे वाटते.

पेट्रोलियम जेलीमुळे चेहरा चमकदार आणि फेशियल केल्याप्रमाणे ताजातवाना दिसतो.

कॉफीचा फेसपॅक : कॉफी चेहऱ्याला लावल्याने रक्तप्रवाह सुरळीत होतो. कॉफीमुळे चेहऱ्यावरील मृत पेशी निघून जातात. ज्यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि डार्क लाईन कमी होतात.

बर्फाचा तुकडा फिरवणे : बर्फाचा तुकडा चेहऱ्यावर फिरवा. त्यामुळे चेहरा फ्रेश होतो. रुमालामध्ये बर्फाचा तुकडा बांधून तो चेहऱ्यावरून फिरवल्यावर काळवंडलेला चेहरा टवटवीत होतो.

* * *

थंडीच्या मोसमात गाजर खायलाच हवं

साधारण थंडीच्या मोसमात भरपूर प्रमाणात उपलब्ध होणारं आणखी एक कंदमुळ म्हणजे गाजर. गाजरामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, अ, ब, क जीवनसत्त्व असते. त्याचबरोबर प्रथिने, खनिजे, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय घटकही असतात. गाजरामध्ये ‘कॅरोटिन’ हा घटक विपुल प्रमाणात असतो. त्यामुळेच कोशिंबीर, सॅलेड, गाजर हलवा, खीर, भाजी, सूप केक, भात अशा अनेक प्रकारांमधून आहारात गाजराचा वापर नियमित करावा. त्यामध्ये असणाऱ्या पौष्टिक घटकांमुळे शरीराला शक्ती व ऊर्जा मिळते. चला तर मग थंडीत मुबलक प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या या गाजराच्या फायद्याविषयी अधिक जाणून घेऊयात.

गाजरामध्ये मोठ्या प्रमाणात ‘अ’ जीवनसत्त्व असल्यामुळे त्याच्या नियमित सेवनाने शक्ती निर्माण होते. म्हणून लहान मुलांची शारीरिक आणि बौद्धिक वाढ चांगली होण्यासाठी नियमितपणे रोज एक गाजर त्यांना खायला द्यावं.

डोळ्यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी गाजराचा नियमितपणे आहारात वापर करावा.

जुलाबाचा त्रास होत असेल तर गाजर वाफवून त्याचे सूप करून प्यावे लगेच आराम पडतो, तसेच शरीरातील पाण्याची कमतरता भरून निघते.

मूळव्याधाचा त्रास होत असल्यास गाजराची कोशिंबीर खाल्ल्याने आराम पडतो.

सौंदर्य खुलवण्यासाठीही गाजराच उपयुक्त आहे. गाजराचे नियमितपणे सेवन केल्याने त्वचा कोमल, मुलायम व सुंदर बनते.

चेहऱ्याचा टवटवीतपणा वाढविण्यासाठी गाजराचा किस चेहऱ्यावर हलक्या हाताने लावावा.

* * *

ही पेयं घ्या आणि तणावमुक्त व्हा

वेगवेगळ्या जबाबदाऱ्यांचा आणि इतरही अनेक गोष्टींचा आपल्यावर ताण येतो. अशाप्रकारचा ताण हा आपले मानसिकच नाही तर शारीरिक आरोग्य बिघडण्यासही कारणीभूत ठरतो. मग थकवा आल्यासारखे वाटल्यास त्यातून सुटका करून घेण्यासाठी आपण अगदी सहज चहा किंवा कॉफी घेतो. चहा कॉफीमध्ये असणारे घटक मेंदूला ताजेतवाने करणारे असतात. त्यामुळे काही काळापुरता नक्कीच आराम मिळतो. पण अशाप्रकारे सतत चहा-कॉफी घेणे आरोग्यासाठी घातक असते. अशावेळी काही ठराविक पेय घेतल्यास तणाव दूर होण्यास निश्चितच फायदा होतो. आता अशी कोणती पेय आहेत जी प्यायल्याने तुम्ही तणावमुक्त होऊ शकता पाहूया...

कोमट दूध : दूध हे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त आणि पोषक असते. तुम्हाला आलेला ताण कमी होण्यासाठी कपभर कोमट दूध प्यायल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो. कोमट दूध प्यायल्याने चांगली झोप लागते.

ग्रीन टी : ग्रीन टी आरोग्यासाठी अतिशय चांगला असतो असे आपण अनेकदा ऐकतो. मेंदूतील ताणाला कारणीभूत असणाऱ्या रासायनिक पदार्थांना नियंत्रणात आणण्यासाठी ग्रीन-टी उत्तम प्रकारे काम करतो.

नारळ पाणी : नारळ पाण्यामुळे शरीरातील ऊर्जेची पातळी वाढण्यास मदत होते. नारळ पाण्यात बी कॉम्प्लेक्सचे प्रमाण जास्त असल्याने त्याचा ताण कमी होण्यासाठी उपयोग होतो. नारळ पाण्यात असणाऱ्या पोटॅशियम, मॅग्नेशियममुळे स्नायू शिथिल होण्यास मदत होते. तसेच रक्ताभिसरण क्रियाही सुधारते.

ताज्या फळांचा ज्यूस : ताज्या फळांचा रस आपल्याला रिफ्रेश करायला अतिशय चांगला पर्याय आहे. फळांमध्ये नैसर्गिक साखर असते, ही साखर मेंदूला तरतरी येण्यासाठी उपयुक्त असते. त्यामुळे ताणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ज्यूस उपयुक्त ठरतो.

कान साफ करण्याचे पाच घरगुती उपाय

कान, नाक, डोळे, जीभ आणि त्वचा ही मानवाची पंचेंद्रिये आहेत हे आपल्या सर्वांना माहित आहेत. ही पंचेंद्रिये ही माणसाच्या शरीररचनेचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे त्याची निगा राखणे, स्वच्छ करणे गरजेचे आहे. यात नाक, डोळे, जीभ आणि त्वचा याची स्वच्छ ठेवणे हे सहज शक्य असते सगळ्यात मोठी समस्या असते ती कान साफ करण्याची. कानाचा पडदा हा खूप नाजूक आणि पातळ असल्यामुळे कानातील मळ साफ करताना जर चुकून त्या भागाला काही झाले तर तुम्हाला कायमचे बहिरेपणही येऊ शकते. अशा वेळी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. विविध शस्त्रक्रिया करूनही कानातील मळ काढता येतो मात्र ते सर्वांना शक्य नसल्यामुळे आणि परवडण्यासारखे नसल्याने तुम्ही काही सोप्या घरगुती उपायांनी देखील कानातील मळ काढू शकता.

१) तेल : ऑलिव्ह, शेंगदाणा किंवा मोहरीचं तेल गरम करून कानात टाकणे हा देखील सोपा उपाय आहे. तेलात जरासं लसूण टाकला तरी चालतो. यामुळे मळ बाहेर पडतो.

२) कांद्याचा रस : कांदा वाफेवर शिजवून किंवा भाजून याचा रस काढून घ्या. त्यानंतर कापसाने रसाचे काही थेंब कानात टाका. याने मळ बाहेर पडतो.

३) मिठाचे पाणी : गरम पाण्यात मीठ घोळून टाकून त्याचे काही थेंब कानात टाका आणि काही सेकंदात ते बाहेर काढा.

४) कोमट पाणी : कापूस घेऊन तो कोमट पाण्यात भिजवून ते पाणी कानात टाका. काही सेकंदात पाणी बाहेर काढा.

५) हायड्रोजन पॅरॉक्साइड : अतिशय कमी प्रमाणात हायड्रोजन पराक्साइड घेऊन तो पाण्यात टाका. थोड्या प्रमाणात ते कानात टाका आणि आता कान उलटून काही सेकंदात ते बाहेर काढा. कानात मळ असल्याने वेळेवर कान साफ न केल्यास खाज येणे, जळजळ किंवा इतर अनेक समस्यांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे कानांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे.

बोट अँब्युलन्स व नवजात शिशूसांठी विशेष रुग्णवाहिकांचा नव्याने समावेश

राज्यात १०८ रुग्णवाहिकांची संख्या दुपटीने वाढणार

पुणे : राज्यातील नागरिकांसाठी १०८ रुग्णवाहिका जीवनदायिनी ठरली आहे. डव्हान्स लाईफ सपोर्ट, बेसिक लाईफ सपोर्ट व बाईक ब्युलन्स या प्रकारात ही सेवा पुरवली जाते. या सेवेत नवजात बालकांसाठी विशेष रुग्णवाहिका व बोट ब्युलन्सचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत १०८ सेवेद्वारे ९३७ रुग्णवाहिका राज्याच्या विविध भागात कार्यरत आहेत. या पुढे १७५६ रुग्णवाहिका राज्याच्या विविध भागात सेवा देणार आहे.

गेल्या १० वर्षात राज्यातील करोडो नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. अनेक नवजात बालकांचा जन्म देखील रुग्णवाहिकेत झाला आहे. त्यामुळे १०८ रुग्णवाहिका सेवा राज्यातील नागरिकांसाठी वरदायिनी ठरली आहे. समुद्र, व नद्यांमध्ये बुडून मृत्युमुखी पडणाऱ्या नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता, नव्याने ३६ बोट बुलंन्स विविध अपघाती समुद्र किनारे व नदी पात्रांमध्ये तैनात होणार आहे. त्याचबरोबर नवजात शिशूंसाठी २५ रुग्णवाहिका नव्याने येणार आहेत.

सद्यस्थितीत रुग्णवाहिकांची संख्या

डव्हान्स लाईफ सपोर्ट : २३३
बेसिक लाईफ सपोर्ट : ७०४
बाईक ब्युलंन्स : ३३

नव्याने वाढणाऱ्या रुग्णवाहिकांची संख्या

डव्हान्स लाईफ सपोर्ट : २२
बेसिक लाईफ सपोर्ट : ५७०
बाईक ब्युलंन्स : १६३
नवजात शिशुंसाठी रुग्णवाहिका : २५
बोट ब्युलन्स : ३६

रुग्णवाहिकेची संख्या वाढल्याने १०८ क्रमांकावर कॉल केल्यानंतर रुग्ण वाहिकेचा प्रतिसाद देण्याची वेळ कमी होणार आहे. विशेषबाब म्हणजे जलदगतीने ब्युलंन्स घटनास्थळी पोहोचणार आहे. दहा वर्षापुर्वी १०८ रुग्णवाहिका सुरु करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. त्याचा सर्व भांडवली खर्च शासनाच्या वतीने करण्यात आला होता. नविन निविदेनुसार ५१ टक्के भांडवली खर्च सेवा पुरवठा करणाऱ्या संस्थेला करावा लागणार आहे. त्यामुळे सदर निविदा १० वर्षांसाठी काढण्यात आली आहे.स्थितीत प्रती महिना ३३ कोटी रुपये शासनाला खर्च करावे लागत होते. रुग्णवाहिकेच्या वाढत्या संख्येमुळे प्रती महिना ६३ कोटी रुपये शासनाला खर्च करावे लागणार आहे. एकंदरीतच अतिरिक्त ३० कोटी प्रतीमहिना शासनाला खर्च करावा लागणार आहे.

बिएमसीचे मुंबईकरांना आवाहन

मुंबई : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मराठा समाजाने आरक्षणासाठी मुंबईकडे कूच करण्यास सुरुवात केली आहे. तर, दुसरीकडे राज्य सरकारच्या निर्देशानंतर आता मराठा समाजाच्या सर्वेक्षणासाठी वेग आला आहे. या सर्वेक्षणासाठी शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांचा सहभाग असणार आहे. मुंबईत होणाऱ्या सर्वेक्षणाला सहकार्य करण्याचे आवाहन मुंबई महापालिकेने केले आहे.

मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील नागरकिंच्या सर्वेक्षणाचे कामकाज मंगळवार २३ जानेवारी २०२४ पासून सुरू होणार आहे.महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या आदेशानुसार करण्यात येणारे हे सर्वेक्षण मुंबई महानगरपालकिा क्षेत्रात देखील करण्यात येणार असून यासाठी महापालिकेचेदेखील सहकार्य असणार आहे. मुंबई महानगरपालिकेचे अधकिारी आणि कर्मचारी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन्ही जिल्ह्यात सर्वेक्षण करणार आहेत. त्यामुळे या प्रशासकीय कामासाठी आपल्या घरी, अपार्टमेंट मध्ये, सोसायटीत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते सहकार्य करा, असे आवाहन मुंबई महानगरपालकिा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

राज्यभरात सुरू होणाऱ्या हे सर्वेक्षण मंगळवार (दनिांक २३ जानेवारी २०२४) पासून मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुरू होणार आहे. यासाठी महानगरपालकिचे अधकिारी आणि कर्मचाऱ्यांना प्रगणक आणि पर्यवेक्षकाचे प्रशक्षिण देण्यात आले आहे.

पाटण येथे श्रीराम मंदिरात महाआरती

राम मंदिरासाठी कारसेवकांचे योगदान अनमोल: विक्रमसिंह पाटणकर

पाटण : आयोध्या नगरीत बांधण्यात आलेल्या प्रभु श्रीरामांच्या भव्य मंदिराच्या उद्घाटन व लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने पाटण येथील सरदार पाटणकर वाड्यातील श्रीराम मंदिरामध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रभु श्रीरामांचे पूजन करुन मान्यवरांच्या हस्ते महाआरती व पुजा करण्यात आली. तसेच यावेळी कारसेवकांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी बोलताना माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर म्हणाले ज्यांच्या परिश्रमातून आज अयोध्येत राम मंदिर साकार झाले अशा कारसेवकांचा सन्मान आजच्या या शुभ दिवशी केलाच पाहिजे. अयोध्येतील श्रीराम मंदिर हे श्रध्दा, प्रेम आणि एकतेचे प्रतिक ठरेल आणि खऱ्या अर्थाने रामराज्याची सुरवात होईल.

कारसेवकांसोबत विक्रमसिंह पाटणकर, सत्यजितसिंह पाटणकर, अमरसिंह पाटणकर, संजय इंगवले व मान्यवर

यावेळी सत्यजितसिंह पाटणकर यांनी अयोध्येतील श्रीराम मंदिर लोकार्पण व उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी मंत्री. विक्रमसिंह पाटणकर, .अमरसिंह पाटणकर,.सत्यजितसिंह पाटणकर(संचालक-सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक),.याज्ञसेन पाटणकर, कारसेवक. संजय इंगवले,.बाळासाहेब जगताप,. दिपक राऊत,.प्रदीप खांडके,. काशिनाथ विभूते,.बाळासाहेब खांडके, तसेच विलासराव क्षीरसागर,.मंगल कांबळे (नगराध्यक्षा).सागर पोतदार (उपनगराध्यक्ष), सर्व नगरसेवक/नगरसेविका, मान्यवर पदाधिकारी व ग्रामस्थ बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाटण तालुक्यात कुणबी दाखले वितरणाची मोहीम होणार वेगवान

२३ जानेवारी पासून प्रत्यक्ष मराठा समाजाचे सर्वेक्षणाचे काम सुरू होणार ... सध्या मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरागे पाटील मोठ्या संख्येने मराठा बांधवासह मुंबईच्या दिशेने जात आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील समजायचे सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला असून त्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात २३ जानेवारी पासून सर्वेक्षण सुरू होत आहे. पाटण तालुक्यात देखील या सर्वेक्षणाची पूर्वतयारी करण्यात आलेली असून प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण नुकतेच पार पाडले असून पाटण तालुक्यात ४५३ प्रगणक व ३२ पर्यवेक्षक यांची या कामाकरीता नेमणूक करण्यात आली असल्याची माहिती प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी दिली आहे. पाटण तालुक्यात मागील महिन्यात कुणबी नोंदीची शोधमोहीम युद्ध पातळीवर राबविण्यात आली असून त्यानुसार पाटण मधील सुमारे २०० गावामध्ये एकूण ३८७३६ कुणबी संदर्भात नोंदी आढळून आल्या असून या सर्व मराठी भाषेतील नोंदी असून मोडी भाषेतील नोंदी वाचनाचे काम लवकरच सुरू होणार असून कुणबी नोंदी संदर्भातील आकडा आणखी वाढणार आहे. या नोंदीच्या पार्श्वभूमीवर पाटण महसूल विभागाने यापूर्वीच कुणबी दाखल्याचे वितरण सुरू केले असून आतापर्यंत सुमारे ८०० कुणबी दाखल्याचे वितरण देखील करण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यात सर्वाधिक नोंदी ह्या पाटण तालुक्यात असून दाखले वितरणाचे प्रमाण देखील पाटण तालुक्यात सर्वाधिक असल्याने पाटण मधील सकल मराठा समांजाने समाधान व्यक्त केले असून मनुष्य बळाची कमतरता असली तरी सुट्टीच्या दिवशी किंवा कार्यालयीन वेळेनंतर रात्री उशिरा पर्यंत कार्यालयात थांबून ही मोहीम अधिक वेगवान करण्यात येणार असल्याचे प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी सांगितले. कुणबी नोंदीच्या दाखल्याची वितरणाची मोहीम अधिक सुटसुटीत व वेगवान करण्यासाठी प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी आज रविवार सुट्टीचा दिवस असताना देखील सेतू कार्यालयात व तहसील कार्यालयात भेट देऊन प्रलंबित दाखल्याचे वितरण तत्परतेने होण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या व जागेवरच सुमारे २३ कुणबी दाखले ऑनलाईन पद्धतीने निर्गमित केले आहे. इतकेच नाही तर प्रांताधिकारी सूनीले गाढे यांनी डिगेवाडी (अडुळ) व लुगडेवाडी येथील ५ कुणबी दाखल्याचे थेट घरपोहच वितरण करून संबंधित अर्जदार याना सुखद धक्का दिला आहे.

यापुढे कुणबी दाखले वितरणाची मोहीम अधिक वेगवान करणार असून जास्तीत जास्त मराठा बांधवांना पुराव्याचे कागदपत्र सादर केलेनंतर तत्काळ दाखले वितरण करण्यात येईल असे प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी पुढे नमूद केले आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार २३ जानेवारी पासून पाटण तालुक्यात जे प्रगणक मराठा समाजाच्या सर्वेक्षणासाठी येणार आहेत.

आ.गोरे यांच्या माध्यमातून औंधला विकासकामांसाठी ९५ लाखाचा निधी

औंध : माण खटाव विधानसभा मतदारसंघांचे कार्यसम्राट आमदार जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून औंध येथे विविध विकास कामांसाठी ९५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य मेजर वसंतराव पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

औंध मधील लोकांच्या हिताच्प्रया लंबित विकासकामांसाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी आम्ही आ. जयकुमार गोरे यांचेकडे पाठपुरावा केला होता. लोकांची भावना लक्षात घेऊन आ.गोरे यांनी सुचवलेल्या कामासाठी निधी मंजूर करून दिला आहे. मंजूर झालेली कामे दर्जेदार करून घेण्यासाठी प्रयत्न करणार आहे. औंध येथील दलित वस्ती येथे अंतर्गत गटर बांधणे १० लक्ष, औंध येथील कुंभार टेक ते आयटीआय रस्ता सुधारणा करणे ३० लक्ष, औंध येथील जोतिबा मंदिराकडे जाणारा रस्ता सुधारणा करणे २५ लक्ष, औंध गावओढा नवटवस्ती मार्गे सुर्यवंशी वस्तीकडे जाणारा रस्ता सुधारणा करणे ३० लक्ष आदी कामांसाठी ९५ लक्ष रुपये निधी मंजूर झाला आहे.

शेती पाणी प्रश्न आ. गोरेच सोडवणार

आ.जयकुमार गोरे यांनी शेती पाण्यासाठी आपली आमदारकी पणाला लावली आहे.औंध परीसरातील शेतकऱ्यांबद्दल त्यांना कळवळा आहे यामुळे त्यांनी विधीमंडळात औंधसह १६गावे उपसा सिंचन प्रश्न उपस्थित करून शासनावर दबाव टाकला आहे. जलसंपदामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून योजनेला निधी मंजूर करून सोळा गावातील शेती पाण्याचा प्रश्न आ.गोरेच सोडवतील असा विश्वास मेजर पवार यांनी व्यक्त केला.

समाज 'मिशन सर्वेक्षण' मोहीम युध्द पातळीवर : महसूलमंत्री विखे पाटील

मुंबई : महसूल विभागाच्या माध्यमातून मराठा समाज 'मिशन सर्वेक्षण' मोहीम राज्यात युध्द पातळीवर राबिण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यानी आज केले. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने राज्यातील कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात संदर्भात सर्वेक्षण करण्याच्या अनुषंगाने पुणे येथे गोखले इन्स्टीट्युटमध्ये मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण कार्यक्रमास शुक्रवार पासून प्रारंभ झाला. याची माहिती मंत्री श्री. विखे पाटील यांनी माध्यमांना दिली.

पुणे येथे गोखले इन्स्टीट्युटमध्ये प्रशिक्षित मास्टर ट्रेनर्स हे जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर संबंधित प्रगणक (इन्म्युरेटर) यांना दिनांक २१ व २२ जानेवारी, २०२४ या दोन दिवसात प्रशिक्षण देणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची दृकश्राव्य माध्यम प्रणालीद्वारे महत्वाची बैठक घेण्यात आली.

हे प्रशिक्षण प्रभावीपणे पार पडावे यासाठी सदर प्रशिक्षणार्थी हे एका बॅचमध्ये ७५ पेक्षा जास्त नसतील. सर्वेच्या अनुषंगाने जिल्हातालुका स्तरावरच्या अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना डॅशबोर्ड देण्यात येईल. त्यामध्ये सर्वेक्षणाची सर्व माहिती उपलब्ध असणार आहे. त्याआधारे या सर्वेक्षणाच्या प्रगतीची अद्ययावत माहिती अहवाल राज्य मागासवर्गीय आयोगास उपलब्ध होणार आहे. तद्नंतर सर्वेक्षणाचे प्रत्यक्ष काम हे दिनांक २३.१.२०२४ ते ३१.१.२०२४ या कालावधीत युध्द पातळीवर होणार आहे. या कामासाठी महसूल, स्थानिक स्वराज्य संस्था, नगर विकास संस्था, शिक्षण विभागाचे सर्व क्षेत्रीय कर्मचारी कार्यरत राहतील.

सर्वेक्षण करताना ऑनलाईन माहिती भरत असताना खुल्या प्रवर्गाचा व्यक्ती असेल तर १२१ प्रश्न संच असलेला फॉरमॅट आवश्यक माहिती भरण्यासाठी कार्यरत होईल. सदर सर्वेक्षणाची माहिती भरताना ती चार भागामध्ये पुढीलप्रमाणे असणार आहे. पहिल्या भागात संबंधित व्यक्तीची मुलभूत माहिती जसे- आधार कार्ड, पॅनकार्ड इ., दुसऱ्या भागात संबंधित व्यक्तीची सामाजिक माहिती, तिसऱ्या भागात संबंधित व्यक्तीची शैक्षणिक माहिती व चौथ्या भागात संबंधित व्यक्तीची आर्थिक माहिती असणार आहे. याप्रमाणे १२१ प्रश्नसंचाची माहिती पूर्ण भरल्यानंतर सिस्टीमवर कॅमेरा ऑन होवून संबंधित व्यक्तीचा फोटो व स्वाक्षरी घेण्यात येवून त्याची ही माहिती संगणक प्रणालीवर जमा होणार आहे.

कुणबी , मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जाती संदर्भात आढळुन आलेल्या नोंदीच्या आधारे संबधित पात्र व्यक्तींना कुणबी,मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर जिल्हयात शिबिरांचे आयोजन करुन पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र तातडीने निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच ज्यांच्या कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा अशा नोंदी आढळून आलेल्या आहेत, त्या संबधित नागरिकांना निदर्शनास येण्याच्या अनुषंगाने त्यांच्या याद्या सर्व तलाठी यांच्या मार्फत गाव स्तरावर मोहिम स्वरूपात प्रसिद्ध करण्यात येणार आहे, जेणेकरून पात्र नागरीकांना जातीचे प्रमाणपत्र प्राप्त होण्याकरता सदर नोंदी या पुरावा म्हणून सादर करता येतील. युध्दपातळीवर होणाऱ्या सर्वेक्षणाच्या प्रगतीवर आपण स्वत: लक्ष ठेवून असणार असल्याचे मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

अंबवडे येथे आज बैलगाडी शर्यती

वडूज : अंबवडे, ता.खटाव येथे मा. प्रभाकर देशमुख साहेबांच्या वाढदिवसा निमित मंगळवार दि. २३ रोजी भव्य बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतीच्या विजेत्यांना अनुक्रमे ३लाख ३हजार,२ लाख ३ हजार,१ लाख ३ हजार,१ लाख ३ हजार ७३ हजार,५३ हजार,३३ हजार,२३ हजार रुपयांची रोख बक्षीसे दिली जाणार आहे.

खा. डॉ.अमोल कोल्हे, आ. बालासाहेब पाटील, आ. शशिकांत शिंदे, आ. रोहितदादा पवार, आ. रविंद्र दंगेकर, नितीन पाटील, मा. आ. प्रभाकर घार्गे, दिपक पवार, सुनिल माने, नंदकुमार मोरे, सुरेंद्रदादा गुदगे, अभय जगताप,संदीप मांडवे,मनोज पोळ, जितेंद्र पवार, मकरंद बोडके आदीसह मान्यवरांच्या ऊपस्थितीत बकसिस वितरण होणार आहे.

रामराव महाविद्यालय,जत येथे विवेकानंद सप्ताह संपन्न

ज्ञान हेच जगामध्ये सर्वश्रेष्ठ : मा.बाबासाहेब नदाफ

जत : जगातील सर्व मोठी माणसे ज्ञानामुळेच यशाच्या शिखरावर गेली असून जगामध्ये ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ आहे म्हणून विद्यार्थ्यांनी ज्ञान मिळवण्यासाठी धडपड केली पाहिजे व आपण मिळविलेल्या ज्ञानातून आपला व समाजाचा सन्मान झाला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते मा.बाबासाहेब नदाफ यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर व राजे रामराव महाविदयालय,जत येथे १२ जानेवारी ते १९ जानेवारी या कालावधीत विवेकानंद सप्ताह साजरा केला जातो.

या विवेकानंद सप्ताह समाप्ती प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील हे होते.

प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.अशोक बोगूलवार यांनी आपल्या प्रास्ताविकात सप्ताहाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा व कार्यक्रमांचा आढावा घेतला.

यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील म्हणाले की, माणसाला माणूस बनवून माणूसकीकडे घेऊन जातो, तोच खरा धर्म असे विवेकानंदानी सांगीतले असून या विवेकानंदाच्या विचारांची आज समाजाला नितांत गरज आहे, असे सांगून ते पुढे म्हणाले की, भारताला २१ व्या शतकात महासत्ता बनवायचे असेल तर आपण जातीधर्माच्या भिंती ओलांडून भारतीय झालो पाहिजे, तरच शोषणमुक्त व भयमुक्त समाज निर्मितीचे विवेकानंदाचे स्वप्त पूर्ण होईल, असेही ते शेवटी म्हणाले.

विवेकानंद सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयात निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यातील प्रथम, व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिस म्हणून प्रमाणपत्र व ग्रंथ प्रमुख मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

व स्पर्धेतील प्रथम व व्दितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांनची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. हा विवेकानंद सप्ताह यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अशोक बोगूलवार व सर्व सदस्य यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.लक्ष्मण मासाळ यांनी तर शेवटी आभारप्रदर्शन प्रा.बी.बी. बेंडेपाटील यांनी केले.

श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठा होत असतानाच जिहेकठापूरचे पाणी आंधळी धरणात

आ. जयकुमार गोरे ; माणवशियांचा दुष्काळी वनवास संपणार. १९ फेब्रुवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते पाणी पूजन

दहिवडी : आज आयोध्देत प्रभु श्री रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा होत असताना त्याच क्षणी जिहेकठापूर उपसा सिंचन योजनेचे पाणी नेर धरणातून आंधळी बोगद्यात सोडण्यात येईल. माझ्यासह चातकासारखी पाण्याची वाट पहाणाऱ्या माणमधील जनतेसाठी हा सुवर्णक्षण आहे. आज रात्रीपर्यंत हे पाणी आंधळी धरणात पोहचणार आहे. या पाण्याचे पूजन १९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती आ. जयकुमार गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खटाव तालुक्यातील नेर धरणात जिहेकठापूर योजनेचे पाणी सोडण्यात आले आहे. हे पाणी पुढे माण तालुक्यात नेण्याचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती देताना आ. गोरे म्हणाले, देशातील रामभक्तांच्या ५०० वर्षांच्या अथक संघर्षानंतर आज आयोध्देतील प्रशस्त मंदीरात प्रभु रामचंद्र विराजमान होत आहेत.

सुवर्णक्षणाचा योग स्वप्नपूर्तीचा आनंद देणारा

रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा आज देशावासियांसाठी जसा सुवर्णक्षण आहे तसा आमच्यासाठी जिहेकठापूरचे पाणी आंधळी बोगद्यात येण्याचा क्षण स्वप्नपूर्तीचा आहे. पाणीयोजनांची कामे करण्यासाठी आम्ही निरंतर आणि खडतर प्रयत्न करत आलो आहोत. त्या प्रयत्नांना यश आले आहे. आणखी उर्वरित कामे करण्यासाठीही माझे वेगवान प्रयत्न सुरु आहेत.

वाढीव सव्वा टीएमसी पाणी लाभदायक ठरणार

उरमोडीचे पाणी कण्हेर कारव्यातून आणताना खूप पाणी वाया जात होते. मी ते पाणी कोंबडवाडीपर्यंत पाईपलाईनद्वारे आणण्याचे फडणवीस यांना सुचवले आणि प्रस्ताव सादर केला. ७५० कोटी खर्चून हे पाणी आता पाईपलाईनद्वारे येणार असल्याने सव्वा टीएमसी पाणी वाचणार आहे. ते वाचलेले पाणी उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांना लागेल तेव्हा पाणी आणता येणार आहे. जिहेकठापूरचे पाणी आल्याने उरमोडीच्या पाण्यावर नदीकाठच्या गावांचा पडणारा बोजा कमी होणार आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या क्षणी प्रभू रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा करतील त्याच क्षणी जिहेकठापूर योजनेचे पाणी खटाव तालुक्यातील नेर धरणातून आंधळी बोगद्यात सोडण्यात येणार आहे. हा माझ्यासाठी स्वप्नपूर्तीचा क्षण आहे. चातकासारखी पाण्याची वाट पहाणाऱ्या माणमधील जनतेसाठी हा परमोच्च आनंदाचा सुवर्णक्षण आहे. उरमोडी, तारळी योजनांचे पाणी आणून आपण ९७ गावांमध्ये सिंचनसुविधा निर्माण केली. गेली १० वर्षे उरमोडीचे पाणी मतदारसंघात येत आहे. नदीच्या उत्तर बाजूला असणारी गावे जिहेकठापूरच्या पाण्याची वाट पहात होती. या योजनेला मी आमदार झाल्यापासून अधिकाधिक निधी मिळवला. एका नलिकेचे काम होवून हे पाणी आज माण तालुक्यातील आंधळी धरणात येत आहे. या योजनेचे नामकरण पंतप्रधान मोदींचे गुरु खटावचे स्व. लक्ष्मणराव इनामदार जिहेकठापूर उपसा सिंचन योजना असे करण्यात आले. पंतप्रधानांनी या योजनेचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करुन लागणारा निधीही दिला. गुरुंच्या नावे असलेल्या योजनेच्या पाण्याचे पूजन करायला मोदीही उत्सुक आहेत. १९ फेब्रुवारीला त्यांच्या हस्ते आंधळी धरणात पाणीपूजन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. माणगंगा नदीतून हे पाणी देवापूरपर्यंत जाणार आहे. उत्तर माणमधील ३२ गावांसाठी वाढीव जिहेकठापूर योजनेचे काम वेगाने सुरु आहे. या योजनेचे पाणी हिंगणीपर्यंत नेणार आहे. पांगरी, बिजवडी, शिंगणापूर ते डोंगराच्या वरचा पट्टा या योजनेत समाविष्ट नव्हता. त्यासाठी पाण्याचे फेरवाटप करुन सव्वा टीएमसी पाणी उपलब्ध करण्यात आले आहे. या गावांसाठी सातशे कोटींच्या योजनेला लवकरच मान्यता मिळणार आहे. आणखीही काही जिहेकठापूरच्या पाण्यापासून वंचित रहात आहेत. त्या गावांचे सर्वेक्षण करुन प्रत्येक गावाला पाणी देण्याचा माझा प्रयत्न सुरु आहे. माण आणि खटावमधील ४४ गावांसाठी टेंभू योजनेतून पाणी देण्याची विस्तारीत योजना मंजूर होवून टेंडर प्रक्रियेपर्यंत आली आहे.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त भाजपा प्रदेश कार्यालयात आनंदोत्सव

अयोध्या येथील भव्य मंदिरात प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात सोमवारी प्रचंड जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. प्रदेश कार्यालयात अयोध्या येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण एल ई डी स्क्रीनद्वारे दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

अयोध्येतील मंदिरात विधिवत प्राण प्रतिष्ठा झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. मिठाई वाटपही करण्यात आले. यावेळी रामभक्तांनी केलेल्या प्रभू रामचंद्रांच्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. या आनंदोत्सव कार्यक्रमात भाजपा प्रदेश समन्वयक विश्वास पाठक, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह, राज पुरोहित, ज्येष्ठ कार्यकर्त्या शैला पतंगे - सामंत, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सुरेश शुक्ल आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या भजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त मुंबईत आणि राज्यातही अनेक ठिकाणी भाजपा तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

रामगीते, रामायण नृत्य, महाआरती व शंखनादातून आनंदोत्सव

श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळ्यानिमित्त 'फ्रेंड्स ऑफ बीजेपी'च्या शिवाजी माधवराव मानकर यांच्यातर्फे आयोजन

पुणे : अयोध्येतील गायक हेमंत ब्रिजवासी यांची भक्तिपूर्ण रामगीते, मनोहारी नृत्यातून उलगणारे रामायणातील प्रसंग, कर्णमधुर शंखनाद, गंगा घाटावरील महाआरती, या सगळ्याला उजळवून टाकणारी विद्युत रोषणाई अन फटाक्यांची आतषबाजी, अशा नयनरम्य सोहळ्यातून प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठेचा आनंदोत्सव सोमवारी पाहायला मिळाला.

शिवाजी माधवराव मानकर यांच्या पुढाकारातून फ्रेंड्स ऑफ बीजेपीतर्फे प्रभू श्रीराम महाआरती व अध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचे राजाराम पुलाजवळील महालक्ष्मी लॉन्समध्ये आयोजन केले होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपकभाऊ मानकर, भारतीय जनता पक्षाचे शहर प्रवक्ते संदीप खर्डेकर, राष्ट्रवादीच्या सांस्कृतिक आघाडीच्या प्रमुख प्रिया बेर्डे, संयोजक शिवाजी माधवराव मानकर, ॲड. मंदार जोशी, अमित जाधव, विजय आढाव, यश वालिया, ॲड. नितीन साबळे, अभिजीत देशपांडे, राज जैन, सुरज शर्मा आदी उपस्थित होते.

शिवाजी माधवराव मानकर म्हणाले, अखंड हिंदुस्थानातील रामभक्तांचे श्रद्धास्थान असलेले प्रभू श्रीराम आज अयोध्येतील राम मंदिरात विराजमान झाले. या सोहळ्याने संपूर्ण देश राममय झाला आहे. ढोल-ताशा वादन, हेमंत ब्रिजवासी यांच्या मधुर आवाजातील रामगीते, जयपूर येथील नृत्य समूहाचे रामायणावरील विलोभनीय नृत्याविष्कार सादर झाले. शंखनाद, गंगा घाट आरती, धुपआरती आणि फटाक्यांच्या आतषबाजीने हा आनंदोत्सव द्विगुणित झाला.

चंद्रकांत पाटील म्हणाले, आजचा आनंदसोहळा अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष प्रभू राम आपल्यात आले आहेत, अशा भावना देशवासीयांच्या आहेत. प्राणप्रतिष्ठा झालेली रामलल्लाची मूर्ती अतिशय बोलकी आहे. ५०० वर्षांच्या संघर्षानंतर प्रभू श्रीराम आज भव्य राम मंदिरात विराजमान झाले आहेत. खऱ्या अर्थाने राजराज्याला सुरुवात झाली आहे. हे केवळ देवाचे मंदिर नसून, जीवन जगण्याचा वस्तुपाठ आहे. संबंध भारताला आणि विश्वाला दिशा देणारा आजचा सोहळा आहे. कुटुंबपद्धती, योग, ध्यानधारणा, कडधान्य आणि भारतीय संस्कृतीचे महत्व अधोरेखित होत आहे. दरवर्षी आजच्या दिनी हा आनंदोत्सव साजरा व्हावा.

दीपकभाऊ मानकर म्हणाले, अखंड हिंदुस्थानातील रामभक्तांचे श्रद्धास्थान असलेले प्रभू श्रीराम आज अयोध्येतील राम मंदिरात विराजमान झाले. सामाजिक बांधिलकी, हिंदू धर्म संस्कृती जपणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेला प्राणप्रतिष्ठा सोहळा डोळ्याचे पारणे फेडणारा होता. लोकांच्या अंतरंगात भगवंताची ओढ देशभर दिसत आहे. प्रभू श्रीरामाची देशभर मनोभावे भक्ती, सेवा होत आहे. शिवाजी मानकर यांनी आयोजिलेला हा नेत्रदीपक असा सोहळा आहे.

शिवाजी माधवराव मानकर म्हणाले, आजच्या सोहळ्याने संपूर्ण देश राममय झाला आहे. ढोल-ताशा वादन, हेमंत ब्रिजवासी यांच्या मधुर आवाजातील रामगीते, जयपूर येथील नृत्य समूहाचे रामायणावरील विलोभनीय नृत्याविष्कार सादर झाले. शंखनाद, गंगा घाट आरती, धुपआरती आणि फटाक्यांच्या आतषबाजीने हा आनंदोत्सव द्विगुणित झाला. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

आगामी निवडणुकांसाठी जळगाव जिल्हा प्रशासन सज्ज

जळगाव : जिल्हा निवडणूक प्रशासन आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सज्ज झाले आहे. उद्या (दि.२३ जानेवारी) नवीन मतदारांच्या समावेशासह मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. सध्या पुरूष व महिला मिळून ३४ लाख ९१ हजार ९८ मतदार आहेत. यात सुमारे ऐंशी हजार नव मतदारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात २०१९ लोकसभा निवडणूकीत ३५५९ मतदान केंद्र होती. या निवडणुकीत ५ मतदान केंद्राची वाढ होत मतदान केंद्रांची संख्या ३५६४ झाली आहे.

जिल्ह्यात शहरी भागात १०६९ व ग्रामीण भागात २४९५ मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्राच्या ठिकाणे शहरी भागात ४३०, ग्रामीण भागात १६०८ असे एकूण २०३८ ठिकाणे आहेत. याव्यतिरिक्त १४ ठिकाणी सहाय्यक मतदान केंद्र असू शकतात कारण त्याठिकाणी मतदारांची संख्या १५०० च्या वर आहे. १७८२ मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगचे नियोजन करण्यात आले आहे. दुर्गम भागातील १६ मतदान केंद्रांवर मोबाईल नेटवर्क नाही.

सध्याच्या जिल्ह्यात ९३३९ बॅलेट युनिट, ५४५० कंट्रोल युनिट आणि ५७३३ व्हीव्हीपीएटी मशिन उपलब्ध आहेत. जिल्ह्याची लोकसंख्या ४७,४०,८८२ इतकी आहे. यात ३४,९१,०९८ मतदार संख्या आहे. मतदारांमध्ये १८,१२,००७ पुरूष तर १६,७८,९५६ महिला मतदार आहेत. तृतीयपंथी १३५ मतदार आहेत. शारीरिकदृष्ट्या दिव्यांग १९२११ मतदार आहेत. ८० वर्षावरील वयोमान असलेले १,०३,१२९ मतदार आहेत.

पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करू इच्छिणाऱ्या गैरहजर मतदाराने सर्व तपशील भरून फॉर्म १२डी द्वारे संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी (इं) कडे अर्ज करावा लागेल. पोस्टल बॅलेट सुविधेची मागणी करणारे असे अर्ज निवडणुकीच्या घोषणेच्या तारखेपासून संबंधित निवडणुकीच्या अधिसूचनेच्या तारखेपासून पाच दिवसांच्या कालावधीत आरओकडे पोहोचले पाहिजेत. असे आवाहन उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी केले आहे.

दोन मतदान अधिकार्यांचा समावेश असलेले मतदान पथक, एक व्हिडिओग्राफर आणि एक सुरक्षा व्यक्ती, मतदाराच्या घरी भेट देतात आणि मतदानाची संपूर्ण गुप्तता राखून मतदाराला पोस्टल बॅलेटवर मतदान करण्यास सांगतात. असे मतदार घरबसल्या मतदान करू शकतात. असे श्री.चिंचकर यांनी सांगितले.

जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांत, पुरुषांपेक्षा ७२ टक्क्यांहून अधिक महिलांनी नोंदणी केली आहे. लिंग गुणोत्तर दर १००० पुरुषांमागे ९२७ महिला असे आहे. यात सुधारणा झाली आहे.

२७ ऑक्टोबर २०२३ ते १७ जानेवारी २०२४ या कालावधीत १८-१९ वयोगटातील मतदारांची संख्या १६२२९ वरून ३८२९६ झाली आहे.

२०२२ पासून जिल्ह्यात एकूण ६३७११ मतदारांची वाढ झाली आहे. २४३०१५ मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत, तर ३,०६,७२६ मतदारांचा मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

नवीन निवडणूक फोटो ओळखपत्र २,९१,१७१ छापण्यात आले आहेत. टपाल विभागाकडून २,३६,०११ निवडणूक छायाचित्र ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. ५५,१६० कार्डचे लवकरच वितरण केले जाणार आहे. असे श्री.चिंचकर यांनी सांगितले. राज्य निवडणूक आयोग व राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने राज्यातील आगामी निवडणुकीच्या दृष्टीने तयारी व मतदार जागृती कार्यक्रमाचा दर आठवड्याला आढावा घेतला जात आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील तयारीबाबत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

कान्होजी आंग्रे समाधी स्थळाचे सुशोभिकरण होणार

पाच कोटींच्या विकास कामांचे आदिती तटकरे यांच्या हस्ते भुमिपूजन

अलिबाग : ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन करून त्यांचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही सर्वाची जबाबदारी आहे. जिल्ह्याच्या वारसास्थळांच्या संवर्धनासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांच्या समाधी स्थळाचे सुशोभिकरण प्रकल्पाअंतर्गत पाच कोटी रुपयांच्या विकास कामांच्या भुमिपूजन समारंभात त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार महेंद्र दळवी, पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, आंग्रे घराण्याचे वंशज रघुजीराजे आंग्रे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते. शिवाजी महाराज आणि सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांचे आपल्या जिवनात अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे त्यांनी केलेले कार्य, त्यांचा वारसा पुढे नेणे गरजेचे आहे. आपला इतिहास जोपासणे आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हीच

खरी छत्रपती शिवाजी महाराजांना आणि कान्होजी आंग्रे यांना मानवंदना ठरेल असा विश्वास आदिती तटकरे यांनी व्यक्त केला. समाधीस्थळाच्या सुशोभिकरणाचे पहिल्या टप्प्यातील काम आज सुरू होत आहे. हे काम सुरू असतांनाच दुसऱ्या टप्प्यातील कामे प्रस्तावित करून त्याचा प्रस्ताव तातडीने सादर करावा म्हणजे उर्वरीत निधी मंजूर करता येऊ शकेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

अलिबाग शहराच्या विकासाठी १२५ कोटींची कामे मंजूर करण्यात आली आहे. ही कामे लवकरच सुरू होतील असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी यावेळी व्यक्त केला. आंग्रे समाधिस्थळाच्या सुशोभिकरणासाठी आदिती तटकरे पालकमंत्री असतांना प्रादेशिक पर्यटन योजनेतून दोन कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामासाठी आणखिन निधी लागणार असल्याने नाविन्य पुर्ण उपक्रमातून तीन कोटी रुपयांचा निधी मी मंजूर करून घेतला. त्यामुळे समाधीस्थळाच्या विकास आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील कामे आता पूर्ण केली जातील. नंतर दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही आमदार दळवी यांनी यावेळी दिली.

कोणती कामे होणार

आंग्रे समाधीस्थळ उद्यानाच्या प्रवेश द्वारावर भव्य गलबताच्या प्रतिकृतीची उभारणी करणे, संरक्षक भिंतीवर कोरीव काम करून, किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारणे, एफआरपी मटेरियलच्या दिपमाळांची उभारणी करणे, कान्होजी राजे आंग्रे यांच्या जीवनावरील म्यूरल्स तयार करणे, उद्यानात रोषणाई करणे यासाठी लागणारे आवश्यक बांधकामे करणे. ही कामे या योजनेअंतर्गत केली जाणार आहेत.

छत्रपती घराण्यात आजपर्यंत ४ छत्रपतींना राजाराम नाव; शाहू महाराजांकडून आठवणींना उजाळा

कोल्हापूर : अयोध्येत राम मंदिर अभिषेक मोठ्या उत्साहात पार पडला. यामुळे देशभरात भक्तीमय वातारवर होते. कोल्हापूर जिल्ह्यातही प्रत्येक गावात राम मंदिर अभिषेक सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापुरात छत्रपती चॅरिटेबल देवस्थानकडून अयोध्येतील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा निमित्त अंबाबाई मंदिर परिसरात असलेल्या राम मंदिरात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्रीमंत छत्रपती शाहू छत्रपती महाराज यांच्यासह संभाजीराजे छत्रपती, मालोजीराजे छत्रपती तसेच सर्वच छत्रपती घराण्यातील सदस्यांनी एकत्र येत आरती आणि पूजा केली.

यावेळी शाहू महाराज यांनी कोल्हापूरसाठी राम नवीन नाही, अशी प्रतिक्रिया दिली. शिवाय छत्रपती घराण्यात आजपर्यंत ४ छत्रपतींना राजाराम हे नाव देण्यात आल्याची आठवण त्यांनी यावेळी सांगितले. आतापर्यंत दिलेल्या नावांवरून छत्रपती घराण्याची रामभक्ती दिसून येत असल्याचे ते म्हणाले. महाराज पुढे म्हणाले की, राम मंदिर हा आनंदाचा क्षण आहे, मी १९५६ साली ८ वर्षांचा असताना अयोध्येत गेलो होतो, अशीही आठवण त्यांनी सांगितली. त्यानंतर जाण्याचा योग आला नाही, पण भविष्यात आला तर नक्की जाईन असेही ते म्हणाले.

दुसरीकडे, अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळा पूर्ण झाला आहे. मंदिरासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेल्या अनेकांची प्रतीक्षा सुद्धा संपली आहे. रामलला गाभाऱ्यात बसवण्यात आले आहेत. रामललाच्या डोक्यावर सोन्याचा मुकुट आणि गळ्यात हिऱ्या-मोत्याचा हार आहे. याशिवाय कानात कुंडल आहेत. हातात सोन्याचे धनुष्य आणि बाण आहे. राम लल्लाच्या अभिषेक सोहळ्यादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गर्भगृहात राम लल्लाची पूजा केली आणि त्यानंतर मूर्तीची विधीवत पूजा पूर्ण झाली. यानंतर पीएम मोदींनी रामललाची आरती केली आणि यादरम्यान यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्यपाल आनंदीबेन पटेल, संघ प्रमुख मोहन भागवत हेही गाभाऱ्यात उपस्थित होते.

ही मूर्ती कर्नाटकातील शिल्पकार अरुण योगीराज यांनी शालिग्राम खडकापासून बनवली आहे. तो काळ्या रंगाचा दगड आहे. धर्मग्रंथ आणि धार्मिक ग्रंथांमध्ये शालिग्राम पाषाण हे भगवान विष्णूचे रूप मानले गेले आहे आणि मर्यादा पुरुषोत्तम श्री राम हे भगवान विष्णूचे सातवे अवतार मानले गेले आहेत. शालिग्राम खडक हजारो वर्षे जुना आहे. हे पाणी प्रतिरोधक आहे. चंदन लावल्याने मूर्तीच्या चकाकीवर परिणाम होत नाही.

नखापासून टोकापर्यंत असलेल्या रामललाच्या मूर्तीची एकूण उंची ५१ इंच असून तिचे वजन सुमारे २०० किलो आहे. रामललाची जुनी मूर्ती अयोध्येच्या पंचकोशी परिक्रमेला प्रदक्षिणा घालून येथील मंदिरांमध्ये नेण्यात आली. यानंतर ती मूर्तीही नवीन मूर्तीसोबत राम मंदिराच्या गर्भगृहात ठेवण्यात आली.

'मेळघाट हाट'चा आदिवासी क्षेत्रातील महिलांना निश्चित लाभ होईल : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अमरावती : मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांद्वारे उत्पादित वस्तूंच्या विक्री व विपणनासाठी 'मेळघाट हाट'चा प्लॅटफॉर्म प्रशासनाद्वारे उपलब्ध करुन दिला आहे. या विक्री केंद्राचा आदिवासी क्षेत्रातील महिलांना निश्चितच लाभ होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

येथील सायन्सकोर हायस्कूलच्या प्रांगणात महिला बचत गटांचे उत्पादन विक्री केंद्राच्या भेटी दरम्यान श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे पाटील, विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, मनपा आयुक्त देवीदास पवार, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी सुनील सोसे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला हक्काचे विक्री केंद्र मिळाले असून यामुळे बचतगटातील महिलांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना योग्य भाव मिळण्यासाठी त्यांचे उत्तम मार्केटिंग, पॅकिंग व ब्रँडिंग करावे. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे महिला महिला सक्षमीकरणासह आदिवासी महिला बचत गटांना निश्चितच प्रोत्साहन मिळेल, असेही ते यावेळी म्हणाले. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने मेळघाट क्षेत्रातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू केले आहे.

यल्लमाच्या नावानं चांगभलंच्या जयघोषात कर्नाटक राज्यातील सौंदत्ती येथे होणाऱ्या यात्रेला

रेणुका देवीच्या पालख्या, बैलगाड्या असंख्य भक्तांच्या सोबतीने रवाना

कुरुंदवाड : उदं... ग आई उदं..यल्लमाच्या नावानं चांगभलंच्या जयघोषात कर्नाटक राज्यातील सौंदत्ती येथे होणाऱ्या रेणुकादेवीच्या यात्रेला येथील रेणुका देवीच्या पालख्या, बैलगाड्या असंख्य भक्तांच्या सोबतीने हलगी-खेताळाच्या निनादात भक्तिमय वातावरणात रवाना झाल्या.

कुरुंदवाड शहरातून सौंदत्ती येथील रेणुकादेवीच्या यात्रेला बैलगाडीने व पायी चालत जाण्याच्या १०५ वर्षांपासूनची परंपरा आहे. कै.गणपतराव पोमाजे यांनी शहररातील बैलगाड्यांची संख्या वाढवून या यात्रेला मोठे स्वरूप निर्माण करून दिले आहे.ही परंपरा आजही अखंडितपणे सुरू आहे.

गुरूवारी २५तारखेला कर्नाटक राज्यातील सौंदत्ती येथे होणाऱ्या रेणुका देवीच्या यात्रेसाठी येथील यल्लमा देवालयातून फुलांनी सजविलेला देवीची पालखी मिरवणुकीने सोमवारी रवाना झाली आहे.या यात्रेच्या पार्श्वभूमीवर कुरुंदवाड शहरातून रेणुकादेवीच्या पालखी सोबत १२ बैलगाड्या आणि भक्तगणांचा पायी प्रवास सुरू झाला आहे.यात्रेसाठी धनपाल पोमाजे, अण्णाप्पा आवळे,दीपक पोमाजे,सखाहरी आवळे,संतोष बागलकोटे, काशिनाथ माळी, दादा सावगावे, सुरेश ठोंबरे,शाहीर आवळे,राजू साळुंखे,धनाजी तोडकर, मारुती डवरी, शालन आवळे, दिलीप आवळे,माजी नगरसेवक राजू आवळे यांनी आपल्या बंदा रुपया बैलगाड्या सजवून बैलांच्या अंगावर झूल घालून यात्रेसाठी रवाना झाले आहेत.

कुरुंदवाड ते सौंदत्ती यात्रेचा १५० किलोमीटरचा पायी प्रवास आहे. चिक्कोडी, गोकाक,मनोळी ते सौंदत्ती या ठिकाणी तिसऱ्या दिवशी वस्ती आहे.नऊ दिवसांचा प्रवास असून पाचव्या दिवशी पहाटे ही यात्रा परतीच्या प्रवासाला लागणार असून नवव्या दिवशी कुरुंदवाड येथील सीताबाई पटवर्धन हायस्कूल येथे दुपारी रेणुकादेवीच्या जगाचे आगमन होणार आहे.

यात्रेसाठी यल्लमा देवालयाचे पुजारी रावसाहेब चव्हाण अमृत चव्हाण अमोल चव्हाण सौ लता चव्हाण,राजू आवळे,आयुब पट्टेकरी,दादासाहेब गायकवाड,मुन्ना बागवान, बेबी पट्टेकरी,सुरज पट्टेकरी,सह आदी भक्तगण मोठ्या संख्येने रवाना झाले आहेत.

कर्नाटक राज्यातील सौंदत्ती यात्रेला रवाना झालेली यल्लमा मंदिरातील मिरवणुकीने निघालेली रेणुकादेवीची पालखी व बैलगाड्या भक्तगण.

राजघराण्याचा लोकभावना जपण्याचा प्रेरणादायी इतिहास जतन करणार : आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर

फलटण : फलटण संस्थानचा इतिहास प्रेरणादायी असून राजघराण्याने संस्थान काळात आणि त्यानंतरही सतत समाजहिताला प्राधान्य दिले असून आजही ती उज्वल परंपरा अखंडित सुरु असल्यानेच नाईक निंबाळकर देवस्थाने व इतर चॅरिटीज ट्रस्ट कडील मंदिरांचा जीर्णोद्धार करुन लोकभावना जपण्याचा आपला प्रयत्न असल्याचे स्पष्ट प्रतिपादन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी केले.

सुमारे ३०० वर्षांपूर्वी संस्थानच्या गादीवर असलेल्या तत्कालीन साध्वी स्त्री श्रीमंत सगुणामाता आईसाहेब महाराज यांनी उभारलेल्या श्रीराम व श्री दत्त मंदिरांच्या शिखर जीर्णोद्धार शुभारंभ विधीपूर्वक होमहवन होऊन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर व अन्य मान्यवरांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात आला. यावेळी श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, युवराज श्रीमंत अनिकेतराजे नाईक निंबाळकर, श्रीमंत सत्त्यजितराजे नाईक निंबाळकर, श्रीमंत विश्वजितराजे नाईक निंबाळकर यांच्यासह राजघराण्यातील मान्यवर आणि नाईक निंबाळकर देवस्थाने व इतर चॅरिटीज ट्रस्टचे ट्रस्टी, सद्गुरु व महाराजा संस्था समुहाचे प्रमुख माजी नगराध्यक्ष दिलीपसिंह भोसले, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि फलटण शहर व तालुक्यातील स्त्री - पुरुष भक्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

आज दोन्ही मंदिरांच्या शिखर जीर्णोद्धाराचा शुभारंभ झाला असला तरी हे काम पूर्ण होताच दोन्ही मंदिरांचे मंडप व परिसर जीर्णोद्धार आणि त्यानंतर राजाळे, जावली व अन्य मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याची योजना असल्याचे सांगत जीर्णोद्धार करताना त्यांच्या मूळ रचनेत कोणताही बदल करण्यात येणार नसल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले.

श्रीमंत मालोजीराजे राजेसाहेब यांच्या कार्यकाळात या पुरातन मंदिरांचे जीर्णोद्धार झाले होते, तथापि सुमारे ३००/४०० वर्षे किंवा त्याहुनही जुनी, जीर्ण झालेल्या या मंदिरांचा जीर्णोद्धार आवश्यक असल्याने त्याबाबत ट्रस्टच्या माध्यमातून टप्याटप्याने सर्व मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यात येणार असल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

अयोध्येतील श्रीराम मंदिराची पुर्नउभारणी आणि त्यामध्ये प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना ही आपण सर्वांचीच इच्छा, अपेक्षा पूर्णत्वास जात असताना त्याच शुभ मुहुर्तावर फलटण येथील पुरातन आणि फलटणचे वैभव असलेल्या श्रीराम व श्री दत्त मंदिर जीर्णोद्धाराचे काम आपण हाती घेत असून या कामाचा शुभारंभ आज विधीवत करण्यात आल्याचे सांगताना जीर्णोद्धार करताना मूळ स्वरुपात कोणताही बदल न करता पूर्वी होती त्याप्रमाणे दोन्ही शिखरे पुन्हा उभी करण्यात येणार असल्याचे श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी आवर्जून सांगितले.

जीर्णोद्धार कामी आपले

किल्ले सज्जनगडावर रामनामाचा गजर

परळी : सर्वज्ञक्षेत्र श्री अयोध्या येथील भगवान श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सज्जनगडावर आज विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते गडावर समर्थ रामदास स्वामी संस्थान व समर्थ सेवा मंडळाच्या वतीने अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. पाच वाजता श्री रामराय व श्री समर्थांची काकड आरती करण्यात आली. यानंतर सकाळी सात वाजता सनईवादन गुढी उभारणे व पूजन तोरण बांधणे हे कार्यक्रम संपन्न झाले .सकाळी साडेसात वाजता श्रीराम व श्री समर्थ समाधीची महापूजा रामदासी मंडळींच्या हस्ते करण्यात आली यावेळी पंचसूक्त पवमान पठण करण्यात आले श्रीराम व श्री हनुमान स्त्रोत्र सातारा येथील(पीएचडी नारायणी समूह) यांच्या हस्ते करण्यात आले सकाळी साडेअकरा वाजता श्री समाधी मंदिरात आरती गायनासह १३ प्रदक्षिणा खड्या आवाजात करण्यात आल्या यानंतर सामूहिक श्री राम रक्षा स्तोत्र पठण वसौ .उमा व श्री संदीप आठले यांच्या हस्ते महाआरती. करण्यात आली दुपारी साडेतीन वाजता सुरेश बुवा सौन्रा रामदासी व वेदमूर्ती समर्थ भक्त उल्हास गुरुजी यांचे सांप्रदायिक भजन नित्य उपासना व सायंकाळी सात वाजता दीपोत्सव व सायंकाळी ची आरती करण्यात आली

समर्थ सेवा मंडळाच्या वतीने श्रीधर कोटी व भक्तनिवास येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रम वाचन उपासना करण्यात आली.

२६ जानेवारी रोजी सातारा येथे श्रवणदोष संदर्भात विनामूल्य सल्ला व तपासणी शिबिराचे आयोजन

सातारा : येथील सोमवार पेठ येथील सर्जन डॉ.आमोद पेंढारकर यांच्या श्रीराम नर्सिंग होम येथे मुंबई येथील जुवेकर नर्सिंग होमचे संचालक, इ एन टी सर्जन व फोर्टिस हॉस्पिटल आणि बॉम्बे हॉस्पिटलचे सल्लागार डॉ.मिनेश जुवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रवणदोष ओळखण्याबाबतचे विनामूल्य सल्ला व तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

येत्या प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी शुक्रवारी सकाळी नऊ ते सायंकाळी चार या वेळेत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये मुलांची स्वतःला तोंडी व्यक्त करण्यास असणारी असमर्थता मोठ्या आवाजांना प्रतिसाद न देणे , श्रवणयंत्राचा वापर न करणे किंवा त्याचा फायदा न होणे.

वाचन, लेखन किंवा कोणत्याही संभाषणात भाग घेण्यास अडचण येणे या श्रवणदोषाबाबत हे श्रवणदोष ओळखून त्याबद्दल श्रवण तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिरात इच्छुकांनी तातडीने आपले नाव नोंदवण्यासाठी श्रीराम नर्सिंग होम,स ोमवार पेठ ,मोती चौक सातारा येथे ९८२२००६४२८ या फोन क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन डॉ. आमोद पेंढारकर , डॉ. मिनेश जुवेकर यांनी केले आहे.

विनामुल्य सल्ला
व तपासणी शिबिर

मराठी साहित्य संमेलनपूर्व सांस्कृतिक कार्यक्रमांची २९ पासून मेजवानी

अमळनेर : ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दि. २, ३ व ४ फेब्रुवारी २०२४ रोजी अमळनेर येथील पू.साने गुरुजी साहित्य नगरी, प्रताप महाविद्यालयात होत आहे. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने २९ जानेवारीपासून संमेलनपूर्व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात कथ्थक नृत्य, तबला वादन, भरतनाट्यम् आदी कार्यक्रम प्रताप महाविद्यालयातील राणे सभागृहात दररोज दुपारी ४ ते ६ वाजेदरम्यान होतील.

दि.२९ रोजी आर्या शेंदुर्णीकर कथ्थक नृत्य, तेजल जगताप एकल तबला वादन तर सुनिल वाघ व त्यांचे सहकारी 'मराठी पाऊल पडते पुढे' हा कार्यक्रम सादर करतील. दि. ३० रोजी नयना कुलकर्णी आणि समूह 'आमची माती आमची संस्कृती', अमळनेर महिला मंच 'सूर तेच छेडीता' तर कानुश्री संगीत विद्यालय, धुळे येथील चमू भरतनाट्यम् सादर करतील. दि. ३१ रोजी मुद्रा स्कूल ऑफ भरतनाट्यम्, जळगाव येथील नेहा जोशी यांचा शिष्य परिवार भरतनाट्यम् सादर करतील. यज्ञेश जेऊरकर एकल तबला वादन तर स्वरांजली, अमळनेरचा चमू 'अशी पाखरे येती' या कार्यक्रमाचे सादरीकरण करतील.

मनोज जरांगे पाटील यांचा अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्रवेश

अहमदनगर : मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची पदयात्रा सकाळी दहा वाजताच्या दरम्यान अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश केला. पाथर्डी तालुक्यातील मीडसांगवी येथे ही पदयात्रा दाखल झाली. मनोज जरांगे पाटील यांची मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराठी येथून प्रारंभ झालेली पदयात्रा शनिवारी बीड जिल्ह्यातील मातोरी गावात मुक्कामी होती. सकाळी मातोरी येऊन पदयात्रेने अहमदनगर जिल्ह्याकडे प्रस्थान केले. सकाळी दहा वाजता पाथर्डी तालुक्यातील बीड सांगवी येथे या पदयात्रेने अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश केला. त्यांच्या स्वागतासाठी हजारो मराठा बांधव तेथे उपस्थित होते. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्यासह पोलिसांचा मोठा फौज फाटही बंदोबस्त साठी तैनात करण्यात आला आहे.

आज संध्याकाळी अहमदनगर येथे नगर पाथर्डी महामार्गावरील बाराबाभळी येथे दीडशे एकर मैदानावर पदयात्रेचा मुक्काम राहणार आहे. तेथे सायंकाळी पाच वाजता मनोज जरांगे पाटील यांची सभा होणार आहे. जेवणासाठीचे स्टॉल ,पिण्याच्या पाण्याची सोय आदी चोख व्यवस्था सभास्थळी करण्यात आली आहे. पदयात्रा दाखल झाल्यानंतर महिलांनी जरांगे पाटील यांच्या बाजूने कडे करून पदयात्रा पुढे नेण्यासाठी पुढाकार घेतला.

हिंगणे गावच्या वयोवृद्ध दांपत्याचे २६ जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालय येथे आत्मदहन

अन्यायाबाबत खटाव तहसीलदार यांना निवेदन : न्याय देण्याची मागणी

वडूज : हिंगणे ता खटाव येथील निकम हे वयोवृद्ध दांपत्य यांनी सातारा येथे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदाहन करणार असल्याचा इशारा दिला आहे. याबाबत त्यांनी खटाव तहसीलदार यांना याबाबत लेखी निवेदन दिले आहे.

या निवेदनातील आशिक माहिती अशी जमिनीच्या कारणावरुन स्वत:चा मुलगा, विवाहीत मुलगी व नातवाकडून होत असलेल्या मानसिक त्रासास कंटाळून ईच्छा मरणास न्यायालयाने परवानगी द्यावी अशी मागणी हिंगणे (ता. खटाव) येथील जयसिंग पांडुरंग निकम व सौ. इंदुबाई जयसिंग निकम या वृध्द दांपत्यांनी केली आहे.

तक्रारदार निकम यांनी स्वत:चा मुलगा राजाराम जयसिंग निकम याच्याविरुध्द वडूज येथील प्रथम वर्ग न्यायालयात पोटगी मागणी अर्ज दाखल आहे. त्याचबरोबर नावाने करुन दिलेल्या जमीनीमध्ये समाधान होत नसल्या कारणाने वाढीव जमीनीसाठी मुलगा, विवाहीत मुलगी प्रमिला जाधव तसेच नातू अनिकेत जाधव अतोनात छळ करत आहेत. मुलगा राजाराम हा वडूज न्यायालयात बेलीफ म्हणून नोकरीस आहे. त्यामुळे निकाल माझ्यासारखाच होणार आहे. मी कोर्टात कामाला आहे. माझे कोणी काही बिगडवू शकत नाही. मी तुम्हाला रस्त्यावर आणून खडी फोडायला पाठवतो असे बोलून सतत मानसिक त्रास देत आहे. त्याचबरोबर सदरचे दांपत्य आजारी असल्याने त्यांना बंधू दत्तात्रय पाटील हे उपचारास मदत करतात. त्यांनाही राजाराम कडून नेहमीच त्रास दिला जातो. अश्या परस्थितीत आम्हा दांपत्यांना जगने मुश्कील झाल्याने आम्हास न्यायालयाने दया मरणाची परवानगी द्यावी अशी मागणी केली आहे.

दरम्यान आमचा न्याय देवतेवर विश्वास आहे. मात्र मुलगा न्यायालयाच्या कामात तांत्रिक दृष्ट्या हस्तक्षेप करु शकतो. त्यामुळे दाव्याच्या गुणवत्तेवर परिणाम होवू नये म्हणून त्याची वडूज येथून पाटण, महाबळेश्वर किंवा खंडाळा अश्या ठिकाणी त्याची बदली करावी. अशीही मागणी त्यांनी केली आहे.

तसेच आमच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेण्याचे काम मुलगा राजाराम जयसिंग निकम, मुलगी प्रमिला उर्फ आशा विजय जाधव, तसेच नातू अनिकेत विजय जाधव, या तिघांनी केला आहे. तसेच सैन्य दलात काम करणारा नातू रुपेश राजाराम निकम ही चार ही लोक आमहाला पैशाच्या जोरावर दमदाटी शिवीगाळ व मारहाण करत असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

लोणावळ्यात सभेसाठी युद्धपातळीवर तयारी सुरू

मावळ तालुक्यात मनोज जरांगेचा मुक्काम : ४०० एकर जागा उपलब्ध

वडगाव मावळ : मराठा आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी शनिवारी आंतरवली सराटी येथून मुंबईच्या दिशेने लाखों मराठ्यांसह कूच केले.बुधवार दि २४ जरांगे पाटील यांचा मुक्काम मावळ तालुक्यातील लोणावळा येथे होणार आहे. पुणे मुंबई महामार्गाच्या लगत वाकसई येथील संत तुकाराम पादुका स्थान जवळील ४०० एकर जागेवर जरांगे पाटील यांचा मुक्काम आणि सभेसाठी जोरदार तयारी सुरू आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आरक्षण योद्धे मनोज जरांगे-पाटील यांनी लाखो मराठा समाज बांधवांसह मुंबईकडे कूच केले आहे. २४ जानेवारीला जरांगे पाटील यांचा लोणावळ्यात सायंकाळी सहा वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी लाखोंच्या संख्येने मराठा बांधव जमा होण्याची शक्यता असून मावळ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा बांधवासाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्यात येत आहे. सभेच्या स्थळाची पंधरा जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई, स्वच्छता केली जाते आहे. जागेचे सपाटीकरणाचे करण्याचे काम सुरू आहे. लवकरच काम पूर्ण होईल. मराठा समाजाचे स्वयंसेवक याठिकाणी जातीने हजर राहत तयारी करत आहेत.

Shot on OnePlus | HASSELBLAD

जरांगे पाटील यांचा दौरा

- मनोज जरांगे-पाटील सकाळ आठ वाजता वाघोली येथून निघणार.
- पुणे, पिंपरी-चिंचवड असे मार्गक्रमण करत दुपारी ते मावळात प्रवेश करतील.
- आंदोलकांसाठी प्रत्येक घरातून पंचवीस भाकरी, शेंगदाणा चटणी आणि ठेचा असा बेत.
- पाण्याचे ऐंशी टँकर तैनात करण्यात येणार.
- फिरत्या शौचालयांचीही व्यवस्था केली जाणार.

अशी आहे वाहन पार्किंग व्यवस्था

सभेला होणारी गर्दी गृहीत धरून जवळपास शंभर एकर जागेवर आंदोलकांच्या मुक्कामाची तर शिलाटणे, कार्ला, वेहेरगाव, वाकसई या गावांमध्ये वाहनांच्या प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. महामार्गालगत असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट्स चालकांनाही यासंदर्भात विनंती करण्यात आली आहे.

सीआयडी मालिका बंद का झाली? तब्बल ६ वर्षांनी खरे कारण आले समोर

टेलिव्हिजनवरील अत्यंत लोकप्रिय आणि दीर्घकाळ चाललेली मालिका म्हणून 'सीआयडी'ला ओळखले जाते. या मालिकेने लहान मुलांपासून थोर मोठ्यांची मने जिंकली. या मालिकेतील एसीपी प्रद्युम्न, इन्स्पेक्टर अभिजीत, दया, फ्रेड्री, डॉ. साळुंखे आणि डॉ. तारिका ही पात्रे आजही लोकप्रिय आहेत. या मालिकेने २०१८ मध्ये प्रेक्षकांचा निरोप घेतला. त्यानंतर तब्बल ६ वर्षांनी ही मालिका बंद होण्यामागचे खरं कारण समोर आले आहे.

सीआयडी या मालिकेमुळे प्रसिद्धीझोतात आलेले शिवाजी साटम, दयानंद शेट्टी, अंशा सय्यद, आदित्य श्रीवास्तव, नरेंद्र गुप्ता या कलाकारांनी नुकतंच सिंगल हँडली या युट्यूब चॅनलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांना सीआयडी ही मालिका लवकर का बंद झाली? अशा प्रश्न विचारण्यात आला. यावेळी सीआयडी फेम दयानंद शेट्टी म्हणजे दयाने स्पष्ट शब्दात उत्तर दिले.

''अंतर्गत राजकारणामुळे कार्यक्रम बंद''

यावेळी दया म्हणाला, ''जेव्हा एखादी गोष्ट सुरु होते, ती कधी ना कधी संपतेच. प्रत्येक गोष्ट ही नष्ट होणारी आहे. प्रत्येक गोष्टीची एक लाईफलाईन असते. प्रत्येक गोष्टीची मुदत संपण्याची एक ठराविक तारीख असते. तशीच या कार्यक्रमाचीही होती. सीआयडी हा कार्यक्रम २१ वर्ष चालला, जी खरंच खूप मोठी गोष्ट आहे. पण २१ वर्ष ज्याप्रकारे या कार्यक्रमाची क्रेझ वाढत गेली, ते पाहता हा कार्यक्रम बंद करण्याची गरज नव्हती. पण यामागे काही अंतर्गत राजकारण असू शकते किंवा मग त्या कार्यक्रमाचे आयुष्यचं तितके असेल. हा कार्यक्रम अचानक बंद झालेला नाही.''

''२०१६ पासून हा कार्यक्रम बंद करण्यासाठीचे प्रयत्न सुरु होते. ज्याप्रमाणे रस्त्याचे एखादे झाड तुम्हाला कापता येत नाहीत, मग काही लोकं हळहळू त्याला इंजेक्शन देतात आणि मग त्यानंतर ते झाडं मरतं, असंच काहीसं या कार्यक्रमाबरोबर झालं. आम्हाला असं वाटतं की कदाचित आमच्या कार्यक्रमाचे निर्माते त्यांना आवडत नसावेत. सीआयडीच्या निर्मात्यांनी बाहेर जावं, अस त्यांना वाटत होतं. त्यावेळी आमच्या सर्व कलाकारांसोबत एक मिटींग झाली. त्यावेळी ते म्हणाले होते.

आयपीएलचा यंदाचा हंगाम कधी सुरू होणार?

आयपीएलचा आगामी १७वा हंगाम २२ मार्चपासून सुरू होऊ शकतो. त्याची अधिकृत घोषणा झालेली नाही. महिला प्रीमियर लीग २२ फेब्रुवारीपासून सुरू होऊ शकते. डब्ल्यूपीएलचा अंतिम सामना १७ मार्च रोजी खेळवला जाऊ शकतो. यानंतर पाच दिवसांनी आयपीएल सुरू होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना २६ मे रोजी होण्याची शक्यता आहे. आयपीएलच्या शेवटच्या हंगामात चेन्नई सुपर किंग्जने गुजरात टायटन्सचा पराभव करून पाचव्यांदा विजेतेपद पटकावले.

बीसीसीआयने या कार्यक्रमाला मंजुरी दिली आहे. मात्र, त्याची अधिकृत घोषणा झालेली नाही. देशातील सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखांच्या घोषणेनंतर आयपीएलचे वेळापत्रक जाहीर होईल, असे बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी आधीच सांगितले आहे. २६ मे रोजी आयपीएलची फायनल झाली, तर टी-२० वर्ल्डकप सुरू होण्यासाठी फक्त काही दिवस शिल्लक राहतील. कारण टी-२० विश्वचषकाला १ जूनपासून वेस्ट इंडिज आणि यूएईमध्ये सुरुवात होणार आहे. तसेच ५ जून रोजी होणारा भारताचा पहिला सामना आणि आयपीएल फायनलमध्ये नऊ दिवसांचे अंतर असेल.

बीसीसीआयने आपल्या संबंधितांशी याबाबत चर्चा केली आहे. महिला प्रीमियर लीगचा दुसरा हंगाम २२ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे. या वेळी दोन शहरांमध्ये हंगाम आयोजित केला जाईल. बंगळुरू आणि दिल्लीमध्ये होईल. गेल्या वेळी सर्व सामने मुंबईतील वेगवेगळ्या मैदानांवर झाले होते. एक-दोन दिवसांत महिला प्रीमियर लीगचे वेळापत्रक जाहीर होऊ शकते, असे मानले जात आहे.

जर आयपीएलच्या या तारखा अंतिम राहिल्या तर भारतीय खेळाडूंना इंग्लंड कसोटी मालिकेनंतर फक्त १० दिवसांचा ब्रेक मिळेल. इंग्लंड विरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटचा सामना ७ ते ११ मार्च दरम्यान खेळवला जाणार आहे. दोन्ही संघांमधील पहिला सामना २५ जानेवारीपासून हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

हाय प्रोटीन डाएट म्हणजे अकाली मृत्यूला आमंत्रण, बॉडी बनवण्याच्या नादात 'हे' करत असाल तर सावधान!

मस्क्युलर दिसावे म्हणून अनेक जण प्रोटीन घ्यायला सुरुवात करतात. प्रोटीन जर मर्यादित प्रमाणात घेतले तर त्याचा शरीराला धोका नसतो. पण जर लवकर बॉडी बिल्डर होण्याच्या नादात त्याचा अतिरेक व ओव्हरडोस झाला तर मात्र त्याचे खूप वाईट परिणाम भोगावे लागू शकतात.

हाय प्रोटीन डाएट म्हणजे अकाली मृत्यूला आमंत्रण, बॉडी बनवण्याच्या नादात 'हे' करत असाल तर सावधान!

सध्या तरुणांमध्ये बॉडी बिल्डर बनण्याची मोठी क्रेझ आहे. मोठ मोठे बायसेप्स, पिळदार शरीरयष्टी साहजिकच लोकांचे लक्ष वेधून घेते. शरीर हे अतिशय मेहनतीने खूप व्यायाम करून कमावले तर त्याचा शरीराला तर फायदा असतोच आणि असे शरीर जास्त काळ टिकते सुद्धा. पण पटकन आपण एकदा मस्क्युलर दिसावे म्हणून अनेक जण प्रोटीन घ्यायला सुरुवात करतात. प्रोटीन जर मर्यादित प्रमाणात घेतले तर त्याचा शरीराला धोका नसतो. पण जर लवकर बॉडी बिल्डर होण्याच्या नादात त्याचा अतिरेक व ओव्हरडोस झाला तर मात्र त्याचे खूप वाईट परिणाम भोगावे लागू शकतात.

किती प्रोटीन घ्यावे?

जर तुम्ही तुमच्या जिम ट्रेनरच्या मार्गदर्शनाखाली प्रोटीन डायट घेत असाल तर ते तुम्हाला तुमच्या आहारातील बदल आवर्जून सांगतील. कारण जेव्हा तुम्ही प्रोटीन डायट घेण्यास सुरुवात करता तेव्हा तुम्ही तूमचा नेहमीचा सामान्य आहार घेऊ शकत नाही. जर त्यांनी स्वत:हून तुम्हाला याबद्दल काही सांगितले नाही तर तुम्ही त्यांना दिवसभर तुम्ही काय काय खाता ते अवश्य सांगा. जेणेकरून तुम्हाला नेमक्या किती प्रोटीनची गरज आहे ते ठरवून तुमच्या प्रोटीन शेकची मात्रा ठरवली जाईल.

प्रोटीनचा अतिरेक केल्यास या समस्या उद्भवतात

प्रोटीन हे आपल्या शरीराला निरोगी आणि स्नायुंना मजबूत करण्यासाठी खूप गरजेचे आहे. पण याचा अर्थ हा अजिबात नाही की प्रोटीनचा ओव्हरडोस तुम्ही घेऊ शकता. प्रत्येक चांगल्या गोष्टीची एक मर्यादा असते जर त्या मर्यादेपेक्षा जास्त त्या गोष्टीची मात्र झाली तर ती गोष्ट वाईटच ठरते. जास्त प्रोटीनमुळे स्नायू निर्माणाची जागा कमजोर होऊ शकते. आता आपण पाहूया अधिक प्रमाणात प्रोटीन घेतल्याने सामान्यत: कोणत्या समस्या उद्भवतात.

पोटात गॅस तयार होणे, घेतलेला आहार योग्य पद्धतीने न पचणे, नेहमी पोट आणि पूर्ण शरीर जड जड भासणे, विष्ठा योग्य प्रकारे न होणे. विष्ठा करताना वेदना होणे, पायदुखी सुरु होणे, चालताना किंवा उभे राहिल्यावर पायाच्या टाचा दुखणे, या शिवाय सुद्धा अनेक गंभीर आजार योग्य वेळेस प्रोटीनचा ओव्हर डोस न थांबवल्यास होऊ शकतात. म्हणून जर तुम्हाला शरीर कमवायचे असेल, बॉडी बिल्डर व्हायचे असेल तर व्यायामाचाच आधार घ्या आणि प्रोटीनचे प्रमाण मर्यादित ठेवा. कोणताही शॉर्टकट हा घातक असतो हे नेहमी लक्षात असू द्या.

शॅम्पू योग्यप्रकारे कसा वापरायचा? जाणून घ्या 'या' काही उपयुक्त टिप्स

केसांची काळजी घेण्यासाठी योग्यप्रकारे काही गोष्टी पाळल्या पाहिजेत. कधी कधी केसांची काळजी घेण्याचा कंटाळा येतो. पण काही गोष्टी ण चुकता केल्यास केस छान राहण्यास मदत होते. बहुतेक लोक आठवड्यातून एकदा तरी आपले केस धुतात, परंतु अनेकांना शॅम्पू नक्की कसा वापरायचा याचा योग्य मार्ग माहित नाही. स्किनझेस्टचे संस्थापक आणि सल्लागार त्वचारोग तज्ञ डॉ. नुपूर जैन सांगतात, केसांची काळजी घेण्याच्या दिनक्रमात शॅम्पूइंग ही सर्वात महत्वाची पायरी आहे, म्हणून काही तथ्ये जाणून घेणे आणि शॅम्पूइंग योग्य कसे करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

केसांच्या प्रभावी काळजीसाठी या आहेत पाच शॅम्पूइंग टिप्स

१. शॅम्पू फक्त टाळू स्वच्छ करण्यासाठी आहे

शॅम्पू फक्त टाळूसाठी आहे, उत्पादनाच्या तीव्रतेनुसार शॅम्पू ३० सेकंद किंवा त्यापेक्षा जास्त काळ एकट्या टाळूमध्ये मालिश केले पाहिजे. लक्षात ठेवा की समान वितरणासाठी आणि चांगले लॅथरिंगसाठी, आपले केस ओले असणे आवश्यक आहे.

२. शॅम्पू कमी प्रमाणात वापरला पाहिजे आपण कमी प्रमाणात शॅम्पू न वापरल्यास केस जास्त कोरडे होऊ शकते. जास्त शॅम्पू लावल्याने तुमचे केस खराब होऊ शकतात. तुमचे केस कितीही लांब असले तरीही, अगदी थोडासा शॅम्पू लावावा.

३. शॅम्पूचा वापर किती वेळा करावा? आपल्यापैकी बरेचजण आठवड्यातून एकदा किंवा दोनदा शॅम्पू लावतात. परंतु तुमच्या केसांच्या पोत आणि टाळूच्या स्वभावावर हे अवलंबून असते की शॅम्पूचा वापर किती वेळा करावा? काहींना दररोज शॅम्पू करण्याची आवश्यकता असू शकते आणि अशा परिस्थितीत सौम्य शॅम्पू वापरणे आवश्यक आहे. काहींना टाळूला नियमित शॅम्पू करण्याची आवश्यकता नसली तरी, पोत आणि वाढीसाठी वारंवारता कमी करणे महत्वाचे आहे. शॅम्पू करताना तुम्हाला काही समस्या येत असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे तुम्हाला चांगले परिणाम

व्हॉटसअ‍ॅप वर चॅटिंगशिवाय करता येणार 'हे' काम, 'या' युजर्सना मिळणार नवे फिचर

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म असलेल्या व्हॉट्सॲपने नुकतेच हे नवे फिचर जारी केले आहे. सध्या हे फीचर अँड्रॉइड बीटा टेस्टर्ससाठी उपलब्ध करण्यात आले आहे. बीटा व्हर्जनमध्ये याची चाचणी झाल्यानंतर हे फिचर येत्या काळात ते सर्व युजर्सना वापरता येईल. तसेच या नव्या फिचरमुळे तुम्हाला जवळपासच्या लोकांना फाईल देखील ट्रान्सफर करता येऊ शकते. यासाठी तुम्हाला यामध्ये शेअर फाइल्सचा पर्याय मिळेल. तसेच तुम्हाला यामध्ये जवळपासच्या लोकांना फाईल शेअर करण्याचा पर्याय देखील उपलब्ध होऊ शकतो.

फाइल्स ट्रान्सफर करण्यासाठी दोन्ही युजर्सना म्हणजेच जो फाईल ट्रान्सफर करतोय त्याला आणि जो फाईल ट्रान्सफर करुन घेतोय त्याला हा पर्याय सुरु ठेवावा लागेल. फाइल निवडल्यानंतर, युजर्सनाच्या मोबाईलवर त्याची रिक्वेस्ट येईल. ती एक्सेप्ट केल्यानंतर फाईल ट्रान्सफरची प्रक्रिया सुरु होईल. सध्या हे फीचर बीटा स्टेजमध्ये आहे. त्यामुळे या व्हर्जनमध्ये फाईल ट्रान्सफर करताना तुम्हाला अडचणी येऊ शकतात. कंपनी आधी देत होती हा पर्याय

व्हॉटस्प आधीच युजर्सना चॅटद्वारे २जीबी पर्यंत फाइल्स ट्रान्सफर करण्याची परवानगी देते. पण यासाठी हायस्पीड डेटा आवश्यक असतो. तसेच हा डेटा वापरताना फाईल ही फाईल डाऊनलोड करताना काही तास लागतात. युजर्सची ही अडचण दूर करण्यासाठी या नवा पर्याय ॲपमध्ये आणण्याचा निर्णय कंपनीकडून घेण्यात आलाय.

नवीन फाइल ट्रान्सफर फीचर अंतर्गत पाठवलेली फाईल देखील एंड-टू-एंड एनक्रिप्टेड असेल आणि तुमच्याशिवाय कोणीही ती पाहू शकणार नाही. तुमच्या ज्यांचा नंबर सेव नाही अशा लोकांना तुम्ही फाईल ट्रान्सफर जेव्हा कराल, तेव्हा तुमचा मोबाईल नंबरही त्यांना दिसणार नाही. याशिवाय कंपनी अनेक नवीन फीचर्सवर काम करत आहे. जे हळूहळू यूजर्ससाठी उपलब्ध होतील.

व्हॉट्सॲपमध्ये आले नवे फिचर

व्हॉट्सॲपच्या आणखी नवीन फिचरचे नाव ॲप अपडेट्स असं आहे. हे फिचर सध्या रोलिंग आऊट स्टेटसमध्येच आहे. या फीचरद्वारे यूजर्सना ॲपच्या लेटेस्ट अपडेटची सूचना आणि व्हॉट्सॲपच्या सेटिंग्जमध्येच ऑटो अपडेटचा पर्याय मिळेल. यामुळे व्हॉट्सॲपचे नवीन अपडेट शोधण्यासाठी यूजर्सना गुगल प्ले स्टोअरवर जाण्याची गरज भासणार नाही. व्हॉटस्पॲप ने सध्या हे अपडेट फक्त निवडक बीटा युजर्ससाठी आणले आहे. बीटा युजर्स बीटा व्हॉट्सॲपच्या या कंपनीच्या नवीन फिचर्सची चाचणी करतात आणि त्यामध्ये काही कमतरता असल्याच त्याविषयी कंपनीला फीडबॅक देतात. उणीवा दूर केल्यानंतर, कंपनी हळूहळू सामान्य वापरकर्त्यांसाठी देखील हे फिचर सुरु करते.

बटाटे, जरा जपूनच

बटाटे आपल्या शरीराला कितपत उपयोगी पडतात आणि ते खावेत की नाही, खायचे असतील तर किती खावेत हा नेहमीचाच चर्चेचा विषय असतो आणि या संबंधात परस्पर विरोधी मते व्यक्त केली जात असतात. बटाटे खाल्ल्याने वजन वाढते असे पूर्वी बोलले जायचे. परंतु आता हा समज दूर झालेला आहे. बटाटे वजन वाढवत नसून कर्बोदकांनी भरलेली असतात आणि त्यातील कर्बोदके लवकर पचन होतात, असे काही लोक सांगत आहेत. मात्र आता अलीकडेच बटाट्याविषयी जो नवा शोध पुढे आला आहे त्यानुसार बटाटे आपल्या अन्नात असता कामा नयेत. परंतु बटाटे खाल्लाशिवाय पर्यायच नसेल तर काही पथ्ये पाळून ती खाल्ली पाहिजेत. ही पथ्ये न पाळल्यास बटाटे आपल्यासाठी फार घातक ठरू शकतात. कारण त्यातून सोलॅनाईन हे मेंदूला घातक ठरणारे द्रव्य निर्माण होते.

सोलॅनाईन आपल्या पोटात भरपूर गेले तर आरोग्याला धोका पोहोचू शकतो आणि ते कोणत्या परिस्थितीत निर्माण होते याच्यावर लक्ष ठेवण्याची गरज आहे. बटाटे घरात आणून तसेच ठेवून दिले जातात. किंबहुना धान्यासारखे बटाटे घरात ठेवून दिले जातात आणि यथावकाश कधीही वापरले जातात. पण तज्ञ मंडळी आता असा इशारा देत आहेत की बरेच दिवस ठेवून दिलेले बटाटे वापरले तर ते आपल्या शरीरामध्ये काही विषारी द्रव्यांची निर्मिती करतात. कधी कधी असे बटाटे सुरूकुतून जातात तर काही वेळेला बटाट्यांची वरची साल खराब झालेली दिसते. अशा परिस्थितीतले बटाटे उन्हात राहिले तर त्यांच्यामध्ये सोलॅनाईन मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. कधी कधी बटाटे इतके दिवस साठवले जातात की त्यांना मोड येतात. असे मोड कापून फेकले तर उर्वरित बटाट्यातील पोषणद्रव्ये आहे तशीच राहतात. मात्र सुरकुतलेले बटाटे तसे राहत नाहीत. तेव्हा हे बटाटे फेकून दिलेले बरे. काही वेळा बटाटे हिरवे पडतात. अशा वेळी ते जर उन्हाला उघडे राहिले तर त्यातही सोलॅनाईन तयार होते. मात्र असे हिरवे झालेले बटाटे या कारणाने फेकून देण्यापेक्षा त्यांचा हिरवा झालेला भाग कापून फेकावा. मग काही नुकसान होत नाही. एकंदरीत बटाटे खाण्याचे पूर्णपणे टाळता येत नाही.

अयोध्येतील राम मंदिर पाहताच प्रसिद्ध संगीतकाराच्या डोळ्यात आलं पाणी

आज देशभरात राममय वातावरण पाहायला मिळत आहे. अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन झाले आहे. शिवाय राम मंदिरात प्रभू श्रीरामाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मिळून पूजा केली. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला बॉलीवूडसह दाक्षिणात्य सुपरस्टार्स उपस्थित राहिले आहेत.

या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, माधुरी दीक्षित, रणबीर कपूर, आलिया भट्ट, रोहित शेट्टी, आयुष्मान खुराना, राजकुमार हिरानी, विक्की कौशल, कतरिना कैफ, कंगना रणौत, मधुर भांडारकर असे अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली आहे. याशिवाय प्रसिद्ध गायक, संगीतकार देखील या सोहळ्याला उपस्थित आहेत. अशातच प्रसिद्ध संगीतकार, गायक अनु मलिक यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

या व्हिडीओत अनु मलिक म्हणतायत की, अलीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मी संगीतबद्ध केलेलं भजन आवडतं असं सांगितलं होतं. ही एक सुंदर अनुभूती असून इथे उपस्थित राहून मला खूप आनंद झाला आहे. जेव्हा मी राम मंदिराच्या परिसरात प्रवेश केला तेव्हा पहिल्यांदा हे मंदिर पाहून माझ्या डोळ्यात पाणी आलं.

दरम्यान, राम मंदिरातील गाभाऱ्यात प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेली रामलल्लाची मूर्ती ही सावळ्या रंगाची आहे. शिल्पकार अरुण योगीराज यांनी घडवलेली ही रामाची मूर्ती ५१ इंच उंच असून या मूर्तीचं वजन २०० किलो इतकं आहे. पाच वर्षे वय असलेल्या मुलाची उंची ही सरासरी ४५ चे ६० इंच इतकी असते. त्यामुळे रामाच्या या बालरुपाची मूर्ती ५१ इंचांची आहे. तसेच हिंदू धर्मात ५१ हा अंक शुभ मानला जातो.

तळ पायांत होणाऱ्या जळजळीमुळे रात्रभर झोप लागत नाही? मग करा 'हे' सोपे उपाय, मिळेल आराम

हल्ली अनेकजण तळपायांमध्ये वेदना जाणवत असल्याची तक्रार करतात. ही गंभीर समस्या नसली तरी याची अनेक कारणे असू शकतात. शरीरात व्हिटॅमिनची कमतरता, हार्मोनल बदल अशा अनेक कारणांमुळे पायांच्या तळव्यात जळजळ होऊ शकते. अशा परिस्थितीत ही समस्या दूर करण्यासाठी आपण काही सोपे उपाय जाणून घेणार आहोत. ज्याच्या मदतीने तुम्ही पायांच्या तळव्यांमधील जळजळ काही दिवसांत कमी करु शकता.

पायाच्या तळव्यांमध्ये जळजळ होण्याची कारणे -

१) वजन वाढल असेल आणि तुम्हाला बराच वेळ उभे राहून काम करावे लागत असेल किंवा चालावे लागत असेल तर त्याचा थेट परिणाम पायंवर होतो ज्यामुळे तळवे दुखू लागतात.

२) जास्त प्रमाणात मद्यपान केले तर पाय जळजळ होऊ शकते.

३) चुकीच्या चालण्यामुळेही पायांच्या तळव्यांमध्ये वेदना होतात.

४) खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी हे देखील तळपायांमध्ये वेदना होण्यामागचे एक कारण आहे.

५) चुकीच्या फुटवेयरचा वापर केल्यासही महिलांना तळपायांमध्ये वेदना जाणवतात.

तळपायांमधील जळजळ कमी करण्यासाठी करा 'हे' सोपे उपाय

१) पायांचे तळवे गरम किंवा थंड पाण्याने शेकवा, यामुळे दुखणं कमी होईल.

२) स्नायूंमधील ताठरपणा दूर करण्यासाठी स्ट्रेचिंग हा सर्वात प्रभावी उपाय आहे. यात काल्प, घोटे आणि तळवे स्ट्रेच करा, ज्यामुळे तळपायांमधील जळजळ कमी होते आणि आराम मिळतो.

३) सकस आहार घेत, वजन नियंत्रणात ठेवा, यामुळे तुम्हाला तळवे दुखीपासून आराम मिळेल.

४) दीर्घकाळ तळवे दुखण्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी व्यायाम करा. स्कॅट्स, प्लँक, ब्रिज पोज शरीराचे स्नायू मजबूत करतात. यामुळे तळवेदुखी दूर होते.

५) पायांच्या तळव्यांमध्ये जळजळ होत असेल तर सकाळी काही वेळ अनवाणी पायाने हिरव्या गवतावर चाला, यामुळेही आराम मिळतो.